अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

## चार वर्षांची पदवी असलेल्या विद्यार्थ्यांना आता थेट 'पी.एच.डी'करता येणार

सुराज्य/नवी दिल्ली

यूजीसीकडून एक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. चार वर्षांची पदवीपूर्ण असलेले विद्यार्थ्यांना आता थेट पीएच.डी साठी प्रवेश घेता येणार आहे. अशी माहिती विद्यापीठ अनुदान आयोगाचे(यूजीसी) अध्यक्ष जगदेश कुमार यांनी दिली आहे.

पीटीआयने यूजीसीच्या हवाल्याने सांगितले की, चार वर्षांचा कार्यक्रम पूर्णत: अंमलात येईपर्यंत तीन वर्षांचे पदवीपूर्व अभ्यासक्रम बंद केले जाणार आहेत. पदवीपूर्व शिक्षण तसेच संशोधन आणि पीएचडी अभ्यासक्रम अधिक सक्षम करण्यासाठी यूजीसी मार्गदर्शन तत्वे जाहीर करण्यची योजना आखत आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाकडून पीएचडी प्रवेशासाठी असलेले पात्रता निकष बदलण्यात आले आहेत. नव्या नियमानुसार आता पदवीनंतर थेट पीएचडीसाठी प्रवेश घेता येणार आहे. त्यासाठी आता पदव्युत्तर पदवीची अट आवश्यकता राहणार नाही. मात्र, यासाठीही युजीसीकडून काही अटी घालण्यात आल्या आहेत. चार वर्षीय पदवी अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना किमान ७५ टक्के गुण किंवा समतुल्य सीजीपीए असल्यास थेट पीएचडीसाठी प्रवेश घेता येणार आहे.

ज्यांनी चार वर्षीय पदवी अभ्यासक्रमानंतर पदव्युत्तर पदवीसाठी प्रवेश घेतला आहे. त्यांनाही पहिल्या किंवा दुसऱ्या वर्षाला पीएसडीसाठी प्रवेश मिळणार आहे. मात्र, तीन वर्षीय पदवी अभ्यासक्रमाला असलेल्या विद्यार्थ्यांना ५५ टक्के गुणांसह दोन वर्षीय पदव्युत्तर पदवी पूर्ण केल्यानंतरच पीएचडीसाठी प्रवेश मिळेल

www.surajyadigital.com गुरुवार दि. १५ डिसेंबर २०२२ ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : ७९ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

# निकाल लागेपर्यंत नको मोर्चा, एकत्र बसा; करा चर्चा

## सीमाप्रश्नी नाही निघाला तोडगा, गृहमंत्र्यांनी दिला समितीचा तोटगा

सुराज्य/नवी दिल्ली

**गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्न पेटला आहे. दोन्ही बाजूने मराठी अन् कन्नड भाषिक भागांवर दावा केला जात आहे. या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्र्यांच्या समवेत झालेल्या दोन्ही राज्यांच्या मुख्यमंत्र्यांच्या बैठकीत निर्णायक तोडगा(मार्ग) निघाला नाही. जोपर्यंत सर्वोच्च न्यायालयातील निकाल लागत नाही; तोपर्यंत दावे-प्रतिदावे सांगत मोर्चा काढण्यापेक्षा दोन्ही राज्यात शांतता राहावी; यासाठी चर्चा करा, त्यासाठी संयुक्त समिती नेमण्याचा तोटगा (तात्पुरता उपाय) केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सुचवला.**

सीमावादावरून कर्नाटक आणि महाराष्ट्र राज्यात सुरू झालेल्या वादंगावर तोडगा काढण्यासाठी बुधवारी दोन्ही राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची बैठक केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या संसदेतील कार्यालयात पार पडली.

या बैठकीला खा. राहुल शेवाळे, धनंजय महाडिक रणजितसिंह नाईक-निंबाळकर व अन्य नेते हजर होते. कर्नाटकचे शिष्टमंडळही या बैठकीला उपस्थित होते. २५ मिनिटे ही बैठक झाली. त्यानंतर गृहमंत्री शहा यांनी माध्यमांना या बैठकीबाबत माहिती दिली.



### राजकारण करू नका...

हा प्रश्न संविधानिक मार्गानेच सुटू शकतो. त्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाची वाट पाहवी लागेल. तोपर्यंत कोणताही अनुचित प्रकार घडू न देणे ही दोन्ही राज्यांची जबाबदारी आहे. या वादाचे राजकारण होऊ नये किंबहुना विरोधकांनी राजकारणासाठी या वादाचा वापर करू नये, असे आवाहन शहा यांनी यावेळी केले.

### तीन-तीन मंत्र्यांची समिती

ही बैठक सकारात्मक झाली. दोन्ही राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी समन्वयाची भूमिका मांडली. त्यामुळे यावर तोडगा काढण्यासाठी समिती स्थापन करण्यात येणार आहे. या समितीमध्ये महाराष्ट्र आणि कर्नाटकाचे प्रत्येकी तीन मंत्री असतील. ही सहा मंत्र्यांची समिती सीमा भागातील वादग्रस्त मुद्द्यांवर चर्चेद्वारे तोडगा काढेल.

### वरिष्ठ आयपीएस अधिकाऱ्यांची समिती

सीमावादावरून दोन्ही राज्यांमध्ये भविष्यात कायदा व सुव्यवस्थेचा राखण्यासाठी वरिष्ठ आयपीएस अधिकाऱ्यांची समिती स्थापन करण्यात येणार आहे. दोन्ही राज्यातील व्यापार, नागरिक व वाहतुकीवर या सीमावादाचा परिणाम होणार नाही याची काळजी ही समिती घेईल. सीमा भागात शांतता राखण्याची जबाबदारी या समितीवर असेल.

### जोपर्यंत निर्णय नाही; तोपर्यंत दावा नाही

सीमाप्रश्नी सन २००५ मध्ये महाराष्ट्राने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केलेली याचिका प्रलंबित आहे. जोपर्यंत त्या याचिकेचा निकाल लागत नाही; तोपर्यंत दोन्ही राज्यांनी कोणताही दावा करायचा नाही, अशी तंबी गृहमंत्र्यांनी दोन्ही राज्यांना दिली असून संविधानिक मार्गानेच यावर तोडगा निघेल, अशी समजही दिली.

### म्हणे ते ट्विटर बोम्मईंचे नव्हते..

कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांच्या नावाने फिरणाऱ्या ट्विटरवर महाराष्ट्रासंबंधी वादग्रस्त वक्तव्य करण्यात आले होते. हा मुद्दा महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी अमित शहा यांच्यासमोर उपस्थित केला. त्यावर 'ते अकाउंट आपलं नव्हतं, त्याचा तपास करून योग्य ती कारवाई केली जाईल' अशी माहिती बसवराज बोम्मई यांनी दिली.

## पंढरपुरात मतिमंद महिलेवर बलात्कार

सुराज्य/पंढरपूर

पंढरपूर शहरात एक ४० वर्षीय अविवाहित मतिमंद महिलेवर गायीच्या गोठ्यात बलात्कार केल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. या घटनेमुळे पंढरपूर शहरात खळबळ उडाली आहे. अर्जुन सूर्यकांत कदम याला याप्रकरणी अटक करण्यात आली आहे.

गेल्या सहा-सात महिन्यापासून पीडितेवर घरात कोणी नसताना तसेच गायीच्या गोठ्यात बोलवून मतिमंद असल्याचा फायदा घेऊन अर्जुन कदम याने अनेक वेळा बलात्कार केला आहे. ज्यावेळी पिडिता गोठ्यात जाण्यास नकार देत हाती त्यावेळी तिला दम देऊन, शिवीगाळ करून मारहाण करायचा तसेच जीव मारण्याची धमकी द्यायाचा. त्यामुळे घाबरून पिडिता त्याच्यासोबत गोट्यात जायची



आणि तो तिच्यावर बलात्कार करायचा अशी फिर्याद पिडीतेच्या बहिणीने पंढरपूर शहर पोलिसात दिली आहे. पीडितेच्या पोटात दुखू लागल्याने फिर्यादीला काहीतरी वेगळे घडल्याचा संशय आल्याने पीडितेला विश्वासात घेऊन विचारणा केल्यानंतर हा सगळा प्रकार समोर आला. अर्जुन कदम याला पोलिसांनी अटक केली असून त्याला ६ दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रशांत भागवत करत आहेत.

## बिहारमध्ये विषारी दारूचा कहर; २१ जणांचा मृत्यू

पाटणा : बिहारमध्ये पुन्हा एकदा विषारी बनावट दारूचा कहर पाहायला मिळत आहे. सारण जिल्ह्यात २४ तासांत विषारी दारू पिऊन आत्तापर्यंत २१ जणांचा मृत्यू झाला आहे.

यात मसरखमध्ये सर्वाधिक म्हणजे १० जणांचा मृत्यू झाला आहे. तर अर्धा डझनहून अधिक जणांवर हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. अनेकांच्या दृष्टीवर परिणाम होत असल्याचे समोर आले आहे. मृतांचे नातेवाईक आजारपणामुळे मृत्यू झाल्याचे सांगत आहेत. या घटनेबाबत पोलीस प्रशासनाकडून अद्याप कोणतीही ठोस माहिती आलेली नाही. या घटनेचा संपूर्ण तपास सुरू आहे, अशी माहिती पोलीस अधिकारी संतोष कुमार यांनी दिली. या घटनेच्या निषेधार्थ संतप्त ग्रामस्थांनी मशरख हनुमान चौक स्टेट हायवे ९० वर मृतदेह ठेवून रोखून धरला आहे. स्थानिक ग्रामस्थांनी जिल्हा प्रशासनाविरोधात घोषणाबाजी केली.

## ट्रॅक्टरच्या अपघातात करकंबमध्ये पाच ठार

### दोन बालकांसह तीन ऊसतोड कामगारांचा मृतामंध्ये समावेश

सुराज्य/पंढरपूर

करकंब येथील उजनी डावा कालव्याच्या ३३ नंबर फाट्यामध्ये ऊसतोड कामगारांचा ट्रॅक्टर कोसळून झालेल्या अपघातात दोन मायलेकरांसह पाच जण ठार झाले असून तीन जण जखमी झाले आहेत. मयत सर्वजण मध्यप्रदेशातील मु पो कोलकी ता वारला जि बडवाणी असून ट्रॅक्टर चालकाविरोधात करकंब पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखाना युनिट नंबर दोन येथील व कामगार होते

मंगळवारी रात्री सव्वाअकाराच्या सुमारास उसाचा ट्रॅक्टर भरून कारखान्याकडे रवाना केल्यानंतर ऊसतोड कामगार एमएच ४५ एस ११८३ ह्या ट्रॅक्टरच्या ट्रॉलीमधून ते राहत असलेल्या मदने वस्तीकडे निघाले होते. यावेळी ट्रॅक्टर बागवान वस्तीजवळील डाव्या कालव्याच्या फाट्यामध्ये कोसळला. यामध्ये ट्रॉली पूर्ण पलटी होऊन त्याखाली सर्व कामगार अडकले होते. कामगारांचा आरडाओरडा ऐकून आजूबाजूच्या लोकांनी अपघातस्थळी धाव घेतली. करकंब पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक महेश मुंडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी तातडीने जेसीबीच्या साहाय्याने ट्रॉली बाजूला करून सर्वांना करकंब ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. पण त्याठिकाणी वैद्यकीय अधिकारी डॉ.तुषार सरवदे यांनी अरविंद राजाराम कदछे (वय २), प्रिया नवलसिंह आर्या (वय २), सुरीका विरसिंग डावर (वय १६),





मकबाई नवलसिंग आर्या (वय २३, सर्वजण राहणार कोलके, ता.वरला, जि. बडवाणी, मध्यप्रदेश) यांना मृत घोषित केले. राजाराम देवसिंग कवछे (वय २३), रिंकू सुमरिया कवछे (वय १६) व सुनीता राजाराम कवछे (वय २३) ह्या जखमींवर उपचार सुरू आहेत. दोन जखमींना पुढील उपचारासाठी सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आले. पण त्यापैकी एकाच तेथे सुनीताबाई कवछे (वय २३) मयत पोचण्यापूर्वीच मृत्यू झाला असून एकावर उपचार चालू आहेत.घटनेची माहिती समजताच करकंबचे जुबर बागवान दत्तू देशमुख उपसरपंच आदिनाथ देशमुख, सामाजिक कार्यकर्ते सचिन शिंदे, आदींनी अपघातग्रस्तांना मदत केली. उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांनी करकंब ग्रामीण रुग्णालयास भेट देऊन घटनेची माहिती घेतली. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक महेश मुंडे करत आहेत.

## वळसंग येथे मिल कामगाराची गळफास घेऊन आत्महत्या

सुराज्य/सोलापूर

वळसंग येथील दत्तनगरात राहणाऱ्या एका ३३ वर्षीय मजुराने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना मंगळवारी सायंकाळच्या सुमारास उघडकीस आली.

दस्तगीर याकूब शेख (वय ३३ रा.वळसंग) असे मयताचे नाव आहे. काल सकाळी त्याची पत्नी मजुरी साठी तर मुले शाळेत गेली होती. सायंकाळी पाच वाजेच्या सुमारास मुले शाळेतून घरी परतली. तेंव्हा हा प्रकार उघडकीस आला. त्याचा मृतदेह छताच्या लाकडी वाशाला दोरीने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. मयत दस्तगीर याच्या पश्चात पत्नी एक मुलगा आणि एक मुलगी असा परिवार आहे. तो मिलमध्ये कामाला होता. अशी नोंद वळसंग पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही. सहाय्यक फौजदार राठोड करीत आहेत.



## सुनेवर बलात्कार : सासऱ्यास १० वर्षाची सक्तमजुरी

पंढरपूर : तालुक्यातील एका गावामध्ये सुनेवर बलात्कार करणाऱ्या सासऱ्याला दहा वर्षे सक्तमजुरीची शिक्षा जिल्हा न्यायालयाने ठोठावली आहे.

आरोपीने १६ एप्रिल २०२१ ते २४ जुलै २०२१ या कालावधीमध्ये नातेसंबंधाचा गैरफायदा घेऊन सुनेवर बलात्कार केला. हा प्रकार वारंवार होत असल्यामुळे पीडित महिलेने पंढरपूर तालुका पोलीस ठाण्यामध्ये याबाबत गुन्हा दाखल केला होता. न्यायालयात हा खटला सुरू झाल्यानंतर सातजणांच्या साक्षी नोंदविण्यात आल्या. त्यामध्ये पीडित महिला, तिचे वडील, वैद्यकिय अधिकारी डॉ. प्रदीप केचे, डॉ. स्वाती बोधले, हवालदार शिवाप्पा बिराजदार व पोलीस तपास अधिकारी प्रकाश मोरे यांचा समावेश आहे. सक्षम पुरावे व महत्त्वाच्या साक्षी यामुळे आरोपीला दहा वर्षे सक्त मजुरी व दंड सुनावण्यात आला. आरोपी ५ ऑगस्ट २०२१ पासून अटकेत असून त्यास अद्याप जामीन मिळाला नाही. या खटल्यात सरकारच्या वतीने ॲड. सारंग वांगीकर यांनी काम पाहिले.

## बायोमेडिकल वेस्ट कचरा टाकणाऱ्या रुग्णालयावर दंडात्मक कारवाई

सोलापूर : महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून शहरातील सात रस्ता परिसरात असलेल्या होमगार्ड मैदाना जवळील इंदिरा आयव्हीएफ हॉस्पिटलवर ५ हजार रुपये दंडाची कारवाई करण्यात आली आहे. सार्वजनिक ठिकाणी व रस्त्यावर कचरा टाकणाऱ्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचे महापालिका उपायुक्त मच्छिंद्र घोलप यांनी नुकतेच सूचित केले आहे. तर दुसरीकडे बायो मेडिकल वेस्ट कचरा टाकणाऱ्या रुग्णालयावर कारवाई करण्यात येत आहे.

शहरातील सात रस्ता परिसरात असलेल्या होमगार्ड मैदाना जवळील इंदिरा आयव्हीएफ हॉस्पिटलवर ५ हजार रुपयांच्या दंडाची कारवाई महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून करण्यात आली आहे. येथील इंदिरा आयव्हीएफ हॉस्पिटलकडून बायो मेडिकल वेस्ट कचरा टाकल्याप्रकरणी कारवाई करून ५ हजाराचा दंड वसूल करण्यात आला असल्याची माहिती घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली. यापूर्वी अनेक रुग्णालयांवर रुग्णालयातील बायोमेडिकल वेस्ट साहित्यकचरा रस्त्यावर, उकिरड्यावर आणि इतरत्र टाकून दिल्या प्रकरणी कारवाई करून दंड वसूल करण्यात आला होता.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आपले कोण अन्... ?

कल्याण

350-87-269

मेन बाजार

490-33-238

## नेहरुनगरातील बीपीएड कॉलेजचे कार्यालय सील

### महापालिकेच्या विशेष वसुली पथकाची कारवाई

सुराज्य/सोलापूर

सोलापूर महापालिकेच्या कर संकलन विभागाच्या विशेष वसुली पथकाकडून थकीत मिळकतकर वसुलीपोटी नेहरूनगर येथील बीपीएड कॉलेजच्या कार्यालयास सील ठोकण्यात आले.बुधवारी दिवसभरात विशेष पथक आणि दैनंदिन वसुली असे एकूण महापालिकेच्या तिजोरीत २ कोटी १३ लाख ६ हजार ८६ रुपये भरणा झाला आहे.

गेल्या आठ दिवसापासून जप्ती व सील कारवाई करण्यात येत आहे. बुधवारी विशेष वसुली पथकाने ५ लाख ३७ हजार २५४ रुपयाच्या थकबाकीपोटी नेहरूनगर येथील बीपीएड कॉलेज कार्यालयास सील ठोकले. विशेष वसुली पथकाकडून होत असलेली सील कारवाई टाळण्यासाठी ३ थकबाकीदारांनी एकूण ९ लाख २४ हजार ४५३ रुपये थकबाकी भरणा केली आहे. यामध्ये गंगाधर तेलगी - १ लाख ७५३ रुपये, सतीश बंडे - ७ लाख ११ हजार ९६७ रुपये, अमेरिकन मिशन - १ लाख ११ हजार ७३३ रुपये मिळकत कर थकबाकी भरली आहे. अशी माहिती महापालिका कर संकलन विभाग प्रमुख युवराज गाडेकर यांनी दिली. विशेष वसुली पथकामार्फत दिवसभरात एकूण तीन थकबाकीदारांकडून ९ लाख २४ हजार ४५३ रुपये वसूल केली आहे तर दैनंदिनसह दिवसभरात एकूण दोन कोटी ३ लाख ८१ हजार ६३३ रुपये वसुली झाली आहे. असे दोन्ही मिळून एकूण २ कोटी १३ लाख ६ हजार ८६ रुपये मिळकतकर थकबाकी वसुली झाली आहे.

### आज अभय योजनेचा आजचा शेवटचा दिवस

महापालिकेच्या वतीने मिळकत कर शास्तीमध्ये ८० टक्के सवलत अभय योजना जाहीर केली आहे. या योजनेचा १५ डिसेंबर रोजी शेवटचा दिवस आहे. त्यानंतर मात्र छोट्या व मोठ्या मिळकत कर थकबाकीदारांविरोधात सरसकट कारवाई करण्यात येणार आहे. तेव्हा मिळकत कर थकबाकीदारांनी कटू कारवाई टाळण्यासाठी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापालिका उपायुक्त विद्या पोळ यांनी केले आहे.



# कर्नाटकचा नवा आदर्श

महाराष्ट्र-कर्नाटक या दोन राज्यांमध्ये सीमावादावरून बराच तणाव झाला. अक्कलकोट आणि जत तालुक्यातील काही गावांनी ठराव करून कर्नाटकात जाण्याची इच्छा व्यक्त केली.कर्नाटकात येवून तर बघा. आम्ही काय काय सुविधा दिल्या आहेत? कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी महाराष्ट्रातील नेत्यांच्या टीकेला उत्तर देताना हा आत्मविश्वास व्यक्त केला होता. इंडीचे आमदार यशवंतगौडा पाटील यांनी सोलापुरात पत्रकार परिषद घेऊन इंडीचा आणि सोलपूरचा पाणी पुरवठा यांची तुलना करून इंडीकर पाण्याच्या बाबतीत कसे सुखी आहेत हे सांगितले होते. असो. तिथल्या भाजप सरकारचे हे यश आम्ही मानतो. कारण आमच्या राज्यातील जनता तिथेही जाते आणि विकास अनुभवत असते. कर्नाटकातील विकासाची ही चर्चा झडत असताना अजून एक सुवार्ता आमच्या कानावर पडली. त्याचाही आनंद व्यक्त केलाच पहिते. ही गुड न्यूज आहे, शेती क्षेत्राविषयी. त्या राज्यातील भीमा खोऱ्यात म्हणजेच विजयपूरमध्ये आणि आलमट्टीच्या खोऱ्यात पाणी मुबलक असल्याने ऊस लागवडीचे क्षेत्र वाढले आहे. त्यामुळे तिथे साखर कारखान्यांची संख्याही वाढते आहे. उसाला चांगला भाव मिळावा म्हणून महाराष्ट्राप्रमाणे तिथेही शेतकरी संघटनांचे आंदोलन सुरू असते. त्याचा विचार करून बोम्मई सरकारने ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे. कर्नाटकमधील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना एफआरपीनंतर आता इथेनॉल विक्रीचाही लाभ मिळणार आहे. हा देशातील पहिलाच प्रयोग असल्याचा दावा बोम्मई सरकारकडून केला गेला आहे. प्रतिटन ऊसामागे एफआरपीशिवाय शेतकऱ्यांना अतिरिक्त ५० रुपये देण्यात येणार असल्याची माहिती कर्नाटकचे मंत्री शंकर पाटील मुनेनकोप्पा यांनी



दिली. एफआरपी व्यतिरिक्त इथोनॉलचा लाभ शेतकऱ्यांना देण्याचा हा निर्णय ऐतिहासिक असल्याचे ते म्हणतात. इथेनॉल विक्रीतून आलेली अधिकची रक्कम आता शेतकऱ्यांना मिळणार आहे. या रकमेमुळे कर्नाटकातील शेतकऱ्यांच्या पदरात २०४ कोटी दान पडणार आहे. कारखान्यांमध्ये उपपदार्थांची निर्मिती होते. त्यातील ५० रूपये दिले जातील तसेच ऊस दराची एफआरपी ३ हजार ५० रूपये आहे तेव्हा अधिकचे ५० रूपये याप्रमाणे शेतकऱ्यांना ३१००चे भाव मिळणार आहे. गेल्या २२ दिवसांपासून कर्नाटकमध्ये ऊसाला वाढीव दर द्यावा, या मागणीसाठी विविध शेतकरी संघटना आंदोलन करत आहेत. अशा वेळी सरकारने इथनॅलचा लाभही शेतकऱ्यांना देण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय जरी कर्नाटक राज्यात झाला असला तरी महाराष्ट्र हे सुद्धा ऊसाचे विक्रमी उत्पादन करणारे महत्वाचे राज्य आहे. ऊस उत्पादन आणि गाळप करण्यात महाराष्ट्र देशात अग्रेसर आहे. साखर कारखान्यांना विविध मार्गातून उत्पन्न मिळते. यामध्ये मोलॅसिस, विजनिर्मिती, सीएनजी सारखे प्रकल्प असतील किंवा इथेनॉल असेल यातून कारखान्यांना चांगले उत्पन्न मिळते. महाराष्ट्रात देखील गेल्या आठ वर्षात साखर कारखान्यांनी इथेनॉल निर्मितीत मोठी वाढ केली आहे.त्यातून २० हजार कोटींचे उत्पन्न मिळाल्याचे जाणकार सांगतात. कर्नाटक सरकारच्या या निर्णयानंतर त्याचे महाराष्ट्रात काय परिणाम होतील? हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. कर्नाटक हे एफआरपी पेक्षा अधिक दर देणारे पहिले राज्य ठरले, यात शंकाच नाही. त्याचा विचार आपल्या राज्यातील सरकार आणि कारखानदारांनी केला पाहिजे. इथेही आंदोलने होतात पण कारखानदार त्यांच्या मागणीनुसार दर देत नाहीत. हा आतापर्यंतचा अनुभव आहे. कर्नाटक राज्याने शेतकऱ्यांची ही अपेक्षा पूर्ण केली आहे, तीच मागणी मागणी दिवंगत शरद जोशी तसेच स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टी यांच्याकडून सातत्याने केली गेली पण शेतकऱ्यांच्या पदरात एफआरपीचे तुकडे करून दर दिले जातात. काही कारखान्यांनी मागील काही वर्षांची एफआरपी अजूनपर्यंत दिलेली नाही. साखर आयुक्तांकडून कारवाईचे केवळ कागदी घोडे नाचवले जातात. त्यामुळे कारखानदारांना कशाचेही भय राहिलेली नाही. साखर उत्पादनाबरोबरच बाय-प्रोडक्ट होतात पण त्याचा नफा दाखवला जात नाही.केवळ रिकव्हरीची सबब पुढे करून भाव २२०० ते २८००शेच्या पुढे जात नाही. तेव्हा आता आपल्या शेजारच्या कर्नाटक राज्यात असा निर्णय झाल्यामुळे याचे परिणाम महाराष्ट्रातही होण्याची शक्यता आहे. त्या राज्याचा आदर्श घेऊन शेतकऱ्यांना लाभ होईल यादृष्टीने सरकार आणि कारखानदारांनी पाऊल टाकायला हवे, हीच अपेक्षा.

## सामाजिक

# बोरामणी विमानतळाची ब्योंबाबोंब

साधारणतः २००८ साली बोरामणी विमानतळाचे पिल्लू सोडण्यात आले. आजपर्यंत त्यावर १२५-१५० कोटी रुपये भूसंपादनासाठी खर्च करण्यात आले आहेत. या क्षेत्रात जी तज्ञ मंडळी असतात, त्यांनी आपली भूमिका चोख बजावलेली आहे. एक महत्त्वाची गोष्ट लक्षात आली ती अशी की- अधिकारी वर्गांकडून, कायदा डोळ्यासमोर ठेवून, प्रशासकीय यंत्रणेमार्फत या विमानतळाच्या निर्मितीसाठी जे जे करता येईल ते ते सर्व अत्यंत प्रामाणिकपणे काम केले गेलेले आहे. कुठून कसा मार्ग काढता येईल याबाबतही खूप सकारात्मक काम झालेले आहे. असे असूनही बोरामणी येथील विमानतळ कार्यान्वित का होत नाही हा मोठा प्रश्न असणार आहे. यातील अभ्यासातून जे निदर्शनास आले ते आम्ही या ठिकाणी मांडणार आहोत.

पहिली गोष्ट आपल्या जागा नेमक्या कोठे आहेत, कशा आहेत याच्या अद्ययावत नोंदी सरकारी यंत्रणेपाशी नाहीत. स्वातंत्र्यानंतरच्या ७५ वर्षांमध्ये सरकारी मालमत्तेच्या नोंदी, अध्ययन, अद्ययावत माहिती न ठेवणे अशी अनेक बेजबाबदार कामे सरकारी यंत्रणेकडून झालेली आहेत. याला जबाबदार कोण? हा मोठा प्रश्न या बोरामणी विमानतळाच्या निमित्ताने उपस्थित होत आहे. खरे पाहायला गेले तर आपण ज्यांना लोकप्रतिनिधी म्हणून निवडून देतो, हे त्यांचे काम असते. ते स्वतःच आपल्या कामात बेजबाबदार असल्यामुळे आणि कमालीचा राजकीय हस्तक्षेप यामुळे प्रशासनाकडून निष्काळजीपणे ही व अशी कामे झालेली नाहीत. अगदी आपल्या सोलापुरातील महानगरपालिकेला सुद्धा आपल्या जागा नेमक्या कुठे आहेत, किती आहेत, त्याच्या हद्दी काय आहेत, याची कल्पना नाही. त्याबाबतच्या दप्तरी नोंदी अद्ययावत नाहीत. नेमका हाच प्रशासकीय गलथानपणा गल्लीपासून दिल्लीपर्यंत अव्याहतपणे चालू आहे. त्याबाबत कोणासही लाज वाटत नाही. अपराधीपणाची भावना नाही. नेमके हेच कारण बोरामणी येथील विमानतळाच्या संदर्भात लक्षात येत आहे

दुसरा गोष्ट अशी आहे की- वनीकरणाच्या जमिनींमुळे बोरामणी विमानतळाची अंमलबजावणी थांबली आहे. हे जे सांगितले जाते ते बरोबर आहे. सदर जागा आपलीच म्हणजे महाराष्ट्र सरकारची आहे अशा भ्रमात महाराष्ट्रातील सर्वच राजकीय पक्ष होते. सातबाराच्या उताऱ्यावरती महाराष्ट्र सरकार अशा जुन्याच नोंदी आहेत. वस्तुतः सदर जमिनी या वनीकरणासाठी केंद्र सरकारच्या संबंधित विभागाकडे केंव्हाच हस्तांतरित झालेल्या आहेत. याच्या नोंदी सातबारावर झालेल्या नाहीत. याची साधी कल्पनाही आमच्या राजकीय पक्षांना आणि आपले प्रतिनिधित्व करणाऱ्या लोकप्रतिनिधींना नाही. नेमक्या याच कारणामुळे या जागेच्या हस्तांतरणाचा विषय अनिर्णित अवस्थेपर्यंत पोहोचला आहे.

आता समजा हा प्रश्न सुटला. राज्य सरकार आणि केंद्र सरकारने ठरविले की- बोरामणी येथील विमानतळ उभे करायचेच. अगदी युद्ध पातळीवरती उभे करायचे. तरी प्रश्न उपस्थित होतो तो यासाठी निधी किती लागेल. या निधींचा प्रस्तावित आकडा १,५०० ते २,००० कोटींपेक्षा अधिक आहे. हा सगळा पैसा एकाच वेळेस उपलब्ध करून दिला, तर आणि तरच कमींत कमी दोन वर्ष आणि जास्तीत जास्त तीन ते चार वर्षे एवढा कालावधी बोरामणी येथील विमानतळ कार्यान्वित होण्यासाठी लागणारा आहे. युद्ध पातळीवर काम करूनच. जागेच्या भूसंपादनासाठी साधारणतः १५० ते २०० कोटी रुपये दिले गेले. त्यास दहा ते बारा वर्षाचा कालावधी लागला. विचार करा १,५०० ते २,००० कोटी रुपये आपल्याला प्राधान्याने मिळतील का? सोलापूर शहराला एवढा मोठा प्राधान्यक्रम दिला जाणार आहे का? पुण्याला प्रचंड संख्येने प्रवासी असून देखील तेथील स्वतंत्र विमानतळाची मागणी अजूनही मंजूर होत नाही आहे. राजकारण अंगात किती भिनले आहे ते पहा.

पुढचा महत्त्वाचा विषय. बोरामणी येथील विमान तळ सुरू करण्यापूर्वी होटगी रोडवरील विमानसेवा चालू ठेवण्याचा सरकारचा निर्णय झाला आहे. होटगी रोड वरील विमानतळावरून विमानसेवेस किती आणि कसा प्रतिसाद मिळतो, हे विचारात घेऊन प्रस्तावित बोरामणी विमानतळासाठी खर्च करावयाचा का नाही याबाबतचा निर्णय होणार आहे. हे मी नाही सांगत आहे. महाराष्ट्र विमान प्राधिकरणाच्या संकेतस्थळावरती याचा स्वच्छ आणि स्पष्ट उल्लेख करण्यात आलेला आहे. याचा थोडक्यात अर्थ असा की होटगी रोडवरील विमानसेवेचा प्रतिसाद बघितल्याशिवाय बोरामणी येथील विमानतळासाठी कोणताही धोरणात्मक निर्णय घेण्यास सरकार तयार नाही आहे.

आता पुढील सगळ्यात महत्त्वाचा



विषय. २००८ चा जो काही शासन ठराव आहे, तो महाराष्ट्र शासनाचा आहे. केंद्राचे सहकार्य आणि सहभाग याशिवाय बोरामणी येथील विमानतळ होऊ शकणारे नाही. यासाठी महाराष्ट्र सरकार आणि केंद्र सरकार याच्यामध्ये करार झाला पाहिजे. तशी कागदपत्रे झाली पाहिजेत. त्यासाठी सर्व संबंधित विभागांमध्ये करार मतदार झाले पाहिजेत. त्यावर संबंधितांच्या सह्या झाल्या पाहिजेत. मगच केंद्रीय विमान प्राधिकरण, बोरामणी येथील विमानतळ सुरू करण्याबाबत लक्ष घालू शकणार आहे. आजपर्यंत महाराष्ट्र शासन आणि केंद्र सरकार यांच्यात बोरामणी विमानतळा संदर्भात कोणताही करार मदार झालेला नाही. ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आपणास कोणीच सांगावयास तयार नाहीत.

थोडक्यात काय तर वनीकरणाची जागा, निधीची उपलब्धता, होटगी रोडवरील विमानतळावरून मिळणारा प्रवाशांचा प्रतिसाद आणि दोन सरकारमधील कराराचा अभाव या सगळ्याचा एकत्रित विचार करता, नजीकच्या भविष्यकाळात बोरामणी येथील विमानतळ सुरू होणारे नाही. जोपर्यंत होटगी रोडवरील विमानतळावरून प्रवासाचा प्रतिसाद बघितला जात नाही, तोपर्यंत बोरामणी येथील विमानतळावरून विमानसेवा सुरू करण्याचा प्रस्ताव कार्यान्वित होणारा नाही. हे उपलब्ध माहितीच्या आधारे लक्षात येत आहे. बाकी येथील ६-७ पाझर तलाव आणि या जागेपासून सुमारे ८ ते १० किलोमीटर लांब असलेला कत्तलखाना, हे बोरामणी विमानतळाच्या निर्मितीसाठी अडथळे नसणार आहेत हे आपण लक्षात घेतली पाहिजे. सोलापूरकरांना वेड्यात काढण्यासाठी बोरामणी विमानतळाबाबत वक्तव्य चालू आहेत. त्यास शिक्षित उच्चशिक्षित मंडळीही बळी पडत आहेत. मनात येईल ते कोणतीही माहिती न घेता लिहित आहेत. सर्वसामान्य जनतेमध्ये मोठा संभ्रम निर्माण केला जात आहे.

आम्ही आमची निरीक्षणे नोंदवलेली आहेत. प्रत्येकास आपले मत व्यक्त करण्याचा अधिकार आहे. तो ज्यांनी त्यांनी पूर्णपणे उपयोगात आणावा. अंतिम निष्कर्ष एकच. होटगी रोडवरील विमानतळावरून प्रवाशांचा प्रतिसाद बघितल्याशिवाय बोरामणी येथील विमानतळ कार्यान्वित होऊ शकत नाही.

हे वास्तव जनतेपासून लपवून ठेवण्यासाठी, बोरामणी येथील विमानतळाबाबत ब्योंबाबोंब चालू आहे. दुसरे काही नाही.

**- श्रीनिवास वैद्य, सोलापूर.**

## टुडेज ब्लॉग

# कर्म हीच पूजा

असे अनेकदा होते की एखाद्या कामासाठी तुमची मदत घेतली जाते व ते काम पूर्ण झाल्यानंतर किंवा यशस्वी झाल्यानंतर तुमचा साधा नामोल्लेखही केला जात नाही. कौतुक तर फार दूर राहिले. कधी तर मदत घेणारी व्यक्ती सर्व काही अनभिज्ञपणा दाखवून बाजूला होते. अशावेळी वाईट वाटणे, राग येणे अगदी स्वाभाविक असते. आपण आपला वेळ त्या कामासाठी उगाचच वाया घालवला असेही वाटून जाते. परंतु अशा प्रसंगाला हसतमुखाने सामोरे जाणे व स्वतःला शांत ठेवणे अत्यंत कठीण असले तरी ते गरजेचे असते. ते काम फक्त तुम्हीच उत्तम करू शकत होतात. किंबहुना तुमच्याशिवाय ते काम पूर्ण होऊच शकले नसते म्हणून तुम्हांला निवडले गेले हे स्वतःला समजवावे व काम पूर्णत्वाचा आनंद मनमुराद लुटावा. कामातून मिळणाऱ्या समाधानापुढे बाकी सर्व फिके समजावे. लोक फक्त कामापुरते गोड बोलतात. जवळ येतात असे नेहमी म्हटले जाते. सर्वांनाच कमी अधिक प्रमाणात हा अनुभव येतोच. मन खट्टू होऊन चिडचिड होऊन, पुन्हा फिरून कोणाला कसली मदत करायचे नाही असा सज्जड दम स्वतःला दिला जातो. परंतु ज्याच्या स्वभावातच कर्म ही पूजेसमान असते ती व्यक्ती इतरांना मदत केल्याशिवाय राहत नाही, आपले काम मनापासून केल्याशिवाय राहू शकत नाही. कामाला ईश्वर मानून कामाची पूजा केल्यास त्यातून मिळणारे समाधान हे अनमोल असते. इतरांना मदत करणे ही खरी माणुसकीच आहे. आपल्या छोट्याशा मदतीने जर कुणाच्या चेहऱ्यावर आनंद विलसत असेल तर काय हरकत आहे! मदत कार्य करायला. कामाशिवाय जीवन निरर्थक आहे. रिकामे मन नैराश्य, अंधार घेऊन येऊ शकते. कार्यातून मिळणारा आनंद आपल्यालाही शांती, सुख, समाधान देऊन





जाते. अनेक संत महात्मे, श्रेष्ठ, यशस्वी व्यक्ती या कर्मयोगी होत्या. आपल्या कामाला ते ईश्वर मानत. म्हणूनच कर्माचे निस्सीम भक्ती ते करू शकले. कामाला ईश्वर मानल्यास हीन विचार मनाला शिवत नाही. निसर्गाकडून शिकावे सक्रियता. कुठलाही मोबदल्याशिवाय आपले काम आनंदाने करत राहणे. निसर्गाचा कितीही गैरफायदा मानवाने घेतला तरी ते आपले कर्म सोडत नाही. सूर्योदय-सूर्यास्त नियमित होतात, झाडे आपले कामे अविरत करतात, कुठलेही मोबदल्या शिवाय.

इंग्रजीत एक प्रसिद्ध म्हण आहे 'साऊंड माईंड इज डेव्हिल्स वर्कशॉप' म्हणजेच 'रिकामे मन हे सैतानाचे घर असते.' आपल्या कर्माचा बुद्धीशी आणि विचारांशी घनिष्ठ संबंध असतो. काम लहान असो की मोठे आपल्या कामात सच्चेपणा, प्रामाणिकपणा जपावा. कर्मास पूजा म्हणून केल्यास कठीणातील कठीण गोष्ट साध्य करणे शक्य होऊ शकते. श्रीमद्भगवद्गीतेत म्हटलेलेच आहे 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन' म्हणजेच कोणत्याही फळाची, मोबदल्याची अपेक्षा न करता आपले कर्म करत रहा. कामातून मिळणारा आपला आनंद कधीच कोणीही राहून घेऊ शकत नाही. कर्म हा सुद्धा मनःशांतीकडे नेणारा एक सुकर मार्ग आहे, अनुभव घेऊन बघायला काय हरकत आहे!

**- मनीषा चौधरी, नाशिक.**

## जन्म हा अखेरचा

# धर्माचारस्थल - ४



महाभारतात यक्षाने युधिष्ठिराला काही प्रश्न विचारले. त्यामध्ये 'माणसाचा मृत्यूनंतर मित्र कोण?' हादेखील प्रश्न होता. माणसाला जिवंतपणी मित्र लागतात.

मित्र नसेल तर तुमचे दु:ख तुम्ही कुणाजवळ सांगून हलके कराल? तुमचा शत्रू थोडाच तुमचे दु:ख ऐकून घेणार असतो? तुमचा मित्रच तुमचे दु:ख सहृदयपणे ऐकतो. तुमच्या दु:खात सहभागी होतो. सुखात सगळे सहभागी असतात. परंतु दु:खात मात्र केवळ खरा मित्रच सहभागी होतो. यक्षाने जेंव्हा विचारले, 'मरणाऱ्या माणसाचा मित्र कोण?' तेंव्हा युधिष्ठिराने उत्तर दिले, 'दान हाच मरणाऱ्याचा मित्र होय'.

मरणाऱ्याच मित्र दानच आहे. अंतकाळी दान केल्यावर जे पुण्य लाभते, त्यामुळेच जीवात्म्याला पुढे सद्गती मिळते. म्हणून प्रत्येकाने आपल्या शक्तीप्रमाणे आयुष्यभर दान केले पाहिजे. लोभ हे सर्व पापांचे मूळ आहे. लोभी मनुष्य कोणालाच काही देत नाही हे खरे. परंतु मेल्यावर तो एक फुटकी कवडीदेखील घेऊन जाऊ शकत नाही. एका सुभाषितकाराने म्हटले आहे -

**कृपणस्य समो दाता न भूतो न भविष्यति ।**
**अस्पृशन्नेव वित्तानि य: परेभ्य: प्रयच्छति ।।**

कृपणासारखा दाता या जगात आजपर्यंत कधी झाला नाही आणि यापुढे कधी होणार नाही. **(क्रमश:) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

## जनमानस

# नराधम 'लव्ह जिहादीं'ना फासावर लटकवा

मुंबईतील हिंदू तरुणी 'श्रद्धा वालकर' हिचे ३५ तुकडे करून तिची निर्घृणपणे हत्या करणारा नराधम लव्ह-जिहादी आफताब पुनावालाच्या विरोधात देशभरात तीव्र संताप व्यक्त होत आहे. हे प्रकरण ताजे असताना उत्तर प्रदेशातील लखनौ येथेही १९ वर्षीय निधी या हिंदू तरुणीने धर्मांतर करण्यास नकार दिल्यामुळे सूफियान या मुसलमान युवकाने तिला चौथ्या मजल्यावरून फेकून तिची निर्दयीपणे हत्या केल्याची दुसरी घटना समोर आली आहे.

या केवळ एक-दोन घटना नसून अनेक उदाहरणे यापूर्वीही समोर आलेली आहेत. जिच्यावर प्रेम करतो, त्या व्यक्तीची अशी निघृण हत्या कोणी करणार नाही. त्यामुळे या वासनांध आणि नराधम 'लव्ह जिहादी' आफताब पुनावाला आणि सूफीयान यांना तात्काळ फासावर लटकवावे, तसेच हिंदू मुलींचे आयुष्य उद्ध्वस्त करणारा नवा आतंकवाद 'लव्ह जिहाद'ला रोखण्यासाठी स्वतंत्र आणि कठोर असा 'लव्ह जिहाद विरोधी कायदा' करण्यात यावा, अशी मागणी हिंदू जनजागृती समितीची महिला शाखा 'रणरागिणी'च्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशद्वार, जिल्हा परिषद येथे आंदोलनाच्या माध्यमातून शासनाकडे करण्यात आली.

यावेळी 'आता अबला नको तू सबला हो, चंडी, दुर्गा, काली हो !', लव्ह जिहादी नराधम आफताबला फाशी द्या!', लव्ह जिहादविरोधी कायदा लागू करा!' अशा घोषणाही देण्यात आल्या. 'लव्ह जिहाद'च्या घटना रोखण्यासाठी येत्या हिवाळी अधिवेशनात 'लव्ह जिहादविरोधी कायदा' करावा !

हिंदू मुलींना फसवून प्रेमाच्या जाळ्यात ओढून त्यांचे धर्मपरिवर्तन करणे, त्यांच्याशी 'निकाह' करणे, याला नकार दिल्यास बलात्कार करणे, ब्लॅकमेल करणे, हत्या करणे आदी गंभीर प्रकारांची हजारो प्रकरणे यापूर्वी उघड झाली आहेत. आपल्या मुली-बाळींना पळवण्यासाठी हे नराधम आपल्या घरापर्यंत पोहोचले आहेत. आपल्या पोटच्या पोरीचे ३५ तुकडे पुन्हा होऊ देणार आहात का? त्यामुळे 'लव्ह जिहाद'च्या घटना रोखण्यासाठी येत्या हिवाळी अधिवेशनात लव्ह जिहाद विरोधी कायदा' करण्यात यावा, अशी मागणी आम्ही या आंदोलनाच्या माध्यमातून करत आहोत, असे श्रीमती अलका व्हनमारे यांनी यावेळी सांगितले.

**- अलका व्हनमारे,**
**समन्वयक, रणरागिणी', सोलापूर.**

# तीन परस्परभिन्न वृत्तींचे विजय

**गुजरात, हिमाचल प्रदेश आणि दिल्ली महापालिका निवडणुकांच्या निकालांनी नव्या राजकीय तर्क व धारणांना जन्म दिला आहे. भाजप, काँग्रेस आणि 'आप'ला कौल देणाऱ्या मतदारांची मानसिकता, मिळालेली सत्ता टिकवून ठेवण्यासाठी काँग्रेस आणि 'आप'कडून घेतल्या जाणाऱ्या खबरदारीचे परस्परभिन्न चित्रही त्यातून पुढे येत आहे.**

राजधानी दिल्लीच्या महापालिकेत आप'ने प्रयत्नांची पराकाष्ठा करून, काहीसा निसटता विजय नोंदवून, भाजपची पंधरा वर्षांची सत्ता संपुष्टात आणली. त्याउलट कुठलेही परिश्रम न करता, कमालीच्या उदासीनतेने मैदानात उतरलेल्या काँग्रेसने हिमाचल प्रदेशात भाजपचा मोठ्या फरकाने पराभव केला. गुजरातमध्ये सलग सातव्यांदा सत्ता मिळवून देताना, सर्वाधिक जागा जिंकून एकतर्फी विजय मिळविण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अहोरात्र प्रचारी मेहनत केली. जनाधाराची पाळेमुळे घट्ट करण्यासाठी माध्यमांच्या मदतीने सतत चर्चेत राहून प्रचार करणारा भाजप, जनतेच्या दैनंदिन गरजांना सर्वोच्च प्राधान्य देत काँग्रेसला मागे टाकून भाजपला आव्हान देण्याचा प्रयत्न करणारा आप' आणि सत्तेत परतण्यासाठी पूर्वपुण्याईवर विसंबून राहणारा काँग्रेस अशा परस्परभिन्न राजकीय वृत्ती या निवडणुकांमध्ये यशस्वी ठरल्या.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भाजप प्रत्येक निवडणूक शेवटचे मत टाकले जाईपर्यंत अतिशय गांभीर्याने लढतो. दिल्ली, हिमाचल प्रदेश किंवा गुजरातच्या निवडणुका लढताना, भाजपने कोणतीच कसर सोडली नाही; पण यश मिळाले गुजरातमध्येच. गुजरातमध्ये पंतप्रधान मोदींनी सारी ताकद आणि प्रतिष्ठा पणाला लावली. 'आप'नेही जोरदार वातावरणनिर्मिती केली; तरीही निवडणुकीचे रणांगण सोडून पळालेल्या काँग्रेसची २७ टक्के मते शाबूत राहिली. उत्तरप्रदेश आणि महाराष्ट्राचे अपवाद वगळता, इतर कोणत्याही राज्यात स्थानिक पातळीवर चेहरे नसलेल्या भाजपला निवडणुका जिंकण्यासाठी मोदींच्याच चेहऱ्याची आवश्यकता भासते. प्रचार यंत्रणा कितीही अतिसक्रिय असली, तरी भाजपच्या जय आणि पराजयातील अंतर मोदींच्या लोकप्रियतेमुळेच निश्चित कमी होते. अमित शहा, जे. पी. नड्डा किंवा अन्य कोणताही नेता निवडणुका जिंकून देण्याच्या बाबतीत मोदींच्या आसपासही पोहोचत नाही, हे या निवडणुकांनी पुन्हा सिद्ध केले.

निवडणुकांच्या काळात अंतर्गत कुरघोडी आणि गटबाजीला विराम मिळाला असेल, तर कुंभकर्णासारखा झोपी गेलेला काँग्रेस पक्ष साम-दाम-दंड-भेद नीतीसह सत्तेतील सर्व यंत्रणांचा वापर करणाऱ्या भाजपसारख्या बलाढ्य पक्षालाही चारीमुंड्या चीत करू शकतो, हे हिमाचल प्रदेशने दाखवून दिले. भाजप आणि काँग्रेससारखी विश्वासार्हता संपादन करण्यासाठी कमालीची चिकाटी, संघर्ष आणि मेहनत करूनही सहजासहजी यश मिळत नाही, हा धडा या निवडणुकांतून 'आप'ला मिळाला. दिल्लीत 'आप'ला नामोहरम करण्यासाठी सत्येंद्र जैन, मनीष सिसोदिया आणि कैलाश गेहलोत यांच्या मागे सीबीआय, ईडी आणि प्राप्तीकर खात्याचा ससेमिरा लावला. भाजपशासित राज्यांचे सात मुख्यमंत्री, गृहमंत्री अमित शहांसह सतरा केंद्रीय मंत्री, राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या प्रचारासह तिहार तुरुंगातील व्हिडिओंचा भडिमार करताना कोणतीच कसर सोडली नाही. त्या मानाने निष्क्रिय काँग्रेसला भाजपने अजिबात लक्ष्य केले नाही.

दिल्लीची महापालिका निवडणूक 'आप'साठी आजवरची सर्वांत अवघड ठरल्याची कबुली



केजरीवाल यांना द्यावी लागली.

दिल्ली महापालिकेत सत्ता आली असली, तरी आता दिल्ली आणि पंजाब विधानसभेसह तिन्ही ठिकाणी भाजपच्या वक्रदृष्टीपासून सदैव सावध राहावे लागेल, याची 'आप'च्या नेत्यांना कल्पना आहे. दिल्ली महापालिकेत सत्तेत परतण्यासाठी भाजप 'आप'चे नगरसेवक फोडण्याचा प्रयत्न करील, २४ तास पाळत ठेवेल. नगरसेवकांचे साधे बोलणेही रेकॉर्ड गेले जाईल. काही केले नाही, तरी गुन्हे दाखल केले जातील. सीबीआय, ईडीचा ससेमिरा मागे लागेल. भाजपचे लोक संपर्कात आल्यास, त्यांच्याशी फाजील बोलू नका. सदैव सतर्क राहून, त्यांचे संवाद रेकॉर्ड करा, अशा सूचना 'आप'च्या नेत्यांनी नवनिर्वाचित नगरसेवकांना दिल्या आहेत. शिकारी भाजपपासून बचाव करण्याची ही रणनीती तशी नवीच आहे.

हिमाचलमध्ये सत्तेत आलेल्या काँग्रेसच्या नेत्यांना भाजपपासून सतर्क राहण्याची उपरती होणार नाही. उलट काही महिन्यांतच काँग्रेसमध्ये असंतोष धगधगायला लागेल आणि असंतुष्ट नेते स्वतःहून भाजपच्या राष्ट्रीय नेत्यांशी संपर्क साधतील. मुख्यमंत्रीपदावरील दावेदारी हुकल्याने नाराज झालेल्या प्रतिभासिंह यांनी तशी सुरुवातही केल्याची चर्चा आहे. निवडणुका जिंकण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणाऱ्या भाजप आणि 'आप'ची जिद्द, चिकाटी एकीकडे व काँग्रेसची निष्क्रियता, उदासीनता, बेपर्वाई दुसरीकडे, असे चित्र त्यातून तयार होत आहे.

**- सुनील चावके.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.



## दि.जैन सैतवाळ सेवा मंडळातर्फे आरोग्य शिबिर

**सोलापूर** : येथील दि.जैन सैतवाळ सेवा मंडळ, प्राईम हेल्थ आणि ई.एन.टी.केअर सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य शिबीर आयोजित केले होते.अशी शिबिरे ही काळाची गरज असून ती वारंवार घेतली जावीत, अशा प्रतिक्रिया मान्यवरांनी उद्घाटन प्रसंगी व्यक्त केल्या. सामुदायिक णमोकार महामंत्रानंतर मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करुन शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. डॉ.सुहास करकमकर, डॉ. प्रशांत गाडे, डॉ.आदित्य पांढरे, डॉ.सचिन पांढरे, डॉ. श्रद्धा करकमकर-पांढरे, डॉ. कल्पना पांढरे यांनी आरोग्य तपासणी करुन मार्गदर्शन केले. सेवा मंडळ पदाधिका-यांच्या हस्ते प्रमुख अतिथी सीए.सुरेश पांढरे, भारतीय जैन संघटनेचे राज्याध्यक्ष श्याम पाटील, बुबणे जैन मंदिराचे विश्वस्त हर्षवर्धन बुबणे आणि वरील सहा डॉक्टरांचा, शाल, बुके आणि सन्मान पत्र देऊन सत्कार करण्यात आला.मंडळाचे अध्यक्ष राजू देशमाने यांनी प्रास्ताविक करुन स्वागत केले. जीवनसाथी मासिकाचे प्रमुख संपादक बाहुबली जि.पुर्वत यांनी मनोगत व्यक्त केले. सचिव अरुण धुमाळ यांनी सूत्रसंचालन करुन सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमास मंडळाचे उपाध्यक्ष प्रदीप पांढरे, कार्याध्यक्ष रवींद्र कटके, कोषाध्यक्ष सूर्यकांत जामगावकर, सहकोषाध्यक्ष राजेश मोहोळकर, सहसचिव अनुप म्हेत्रे, सदस्या अमिताकटके,मीना आळंदकर, सदस्य अमित अ.कटके,संदीप पुर्वत, सुनेत्रा पंडित, नंदकुमार कंगळे,नंदकुमार रणदिवे, बाहुबली भूमकर, किशोर म्हेत्रे, अनंतकुमार रणदिवे, अशोक भालेराव इ. समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिबीर यशस्वी करण्यासाठी प्राईम हेल्थ, ई.एन.टी.केअर सेंटर, मेडिकल कर्मचा-यांनी परिश्रम घेतले.

## संत विचारच जगाला तारक : राज्यपाल कोश्यारी

**मुंबई** : संतांच्या सहवासाशिवाय देवाची प्राप्ती शक्य नाही. त्यामुळे संत विचार हेच जगाला तारक आहेत असे प्रतिपादन राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांनी केले. संत शिरोमणी नामदेव महाराज यांच्या ७५२ व्या जयंती निमित्त भागवत धर्म प्रसारक समिती, पालखी सोहळा पत्रकार संघ व नामदेव समाजोन्नती परिषद आयोजित श्री क्षेत्र पंढरपूर ते श्री क्षेत्र घुमान या २३०० किलोमीटर रथ व सायकल यात्रेचा वृत्तांत देण्यासाठी तसेच शैक्षणिक अभ्यासक्रमात संत चरित्र आणि संत वांगमयाचा समावेश करावा या मागणीचे निवेदन देण्यासाठी योगी निरंजननाथ, अध्यक्ष सूर्यकांत भिसे, उपाध्यक्ष शंकर टेमघरे, सचिव विलास काटे व खजिनदार मनोज मांढरे यांनी राज्यपाल कोश्यारी यांची मुंबई राजभवनामध्ये भेट घेतली. श्री विठ्ठलाची मूर्ती व शाल देवून त्यांचा सन्मान केला. त्यांना घुमान रथ व सायकलवारीची माहिती दिली. त्यावेळी त्यांनी आपले विचार मांडले.

## कुमठा नाका येथे जिल्हास्तरीय योगासन स्पर्धा


**मंगळवेढा** : १२ डिसेंबर २०२२ रोजी सोलापूर जिल्हा कार्यालय कुमठा नाका सोलापूर येथे शालेय जिल्हास्तरीय योगासन स्पर्धा संपन्न झाल्या.या स्पर्धेत जवाहरलाल हायस्कूलच्या इयत्ता दहावीत शिकणाऱ्या गौतमी माने हिने नेत्रदीपक कामगिरी करत १७ वर्षीय मुलींमध्ये आर्टिस्टिक योगासन क्रीडा प्रकारात प्रथम क्रमांक पटकावला तसेच१४ वर्षे मुले रीदमिक योगासन क्रीडा प्रकारात सातवीमधील सुमित संतोष दुधाळ याने प्रथम क्रमांक मिळवला. दोन्ही विद्यार्थ्यींची अहमदनगर येथे होणाऱ्या विभागीय शालेय योगासन स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या योगासन यशाबद्दल प्रशालेतील विज्ञान विषयाचे तज्ज्ञशिक्षक मिलिंद कुलकर्णी व सुनंदा माने यांच्या हस्ते गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला.वरील विद्यार्थ्यांना प्रशालेतील योग शिक्षक संतोष दुधाळ, नितीन मोरे, शिवकुमार स्वामी व शहाजी ढोबळे यांनी मार्गदर्शन केले. प्रशालेचे मुख्याध्यापक शंकर आवताडे तसेच मंगळवेढा एज्युकेशन सोसायटी मंगळवेढ्याचे अध्यक्ष राहुल शहा व संस्थेचे सदस्य यांनी यशस्वी खेळाडू आणि मार्गदर्शक शिक्षक यांचे अभिनंदन केले आणि पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.




## समावि प्राथमिक शाळेचे स्नेहसंमेलन जल्लोषात

**अकलूज** : सदाशिवराव माने विद्यालय प्राथमिक विभाग अकलूज शाळेचे वर्षिक स्नेहसंमेलन 'जयोत्सव २०२२-२३' चे आयोजन दिनांक १३, १४ आणि १५ डिसेंबर रोजी स्मृतीभवन यशवंतनगर अकलूज याठिकाणी करण्यात आले.कार्यक्रमाचे उद्घाटन शिक्षण प्रसारक मंडळ अकलूजचे मार्गदर्शक संचालक जयसिंह शंकरराव मोहिते-पाटील (बाळदादा)यांचे शुभहस्ते पार पडले. या कार्यक्रमास शिक्षण प्रसारक मंडळ अकलूजचे अध्यक्ष संग्रामसिंह जयसिंह मोहिते-पाटील, संचालिका स्वरूपाराणी जयसिंह मोहिते-पाटील, संचालक उत्कर्ष शेटे, बाळासाहेब सणस, प्रशाला समिती सदस्या वैशाली कुलकर्णी, जावळे वहिनी, कृष्णराज माने आदी उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका नूरजहाँ शेख यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश करडे सर आणि गिरिश सूर्यवंशी यांनी केले.दिनांक १४ रोजी सोलापूर जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी संजय जावीर तर दिनांक १५ रोजी माळशिरस पंचायत समितीचे गटशिक्षण अधिकारी धनंजय देशमुख यांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडणार आहे.

## महादेवी अंबरशेट्टी



**सोलापूर** : अक्कलकोट रस्त्यावरील हेरिटेज मनीधारी एम्पायर सोसायटी येथील रहिवासी महादेवी विश्वनाथ अंबरशेट्टी (वय ४२) यांचे अल्प आजाराने बुधवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

## दशरथ वडतिले



**सोलापूर** : सोलापूर बुरुड समाजाचे कार्यकर्ते दशरथ आनंदा वडतिले यांचे अल्पशा आजाराने मंगळवार दि.१३ डिसेंबर रोजी सकाळी निधन झाले. ते ५८ वर्षांचे होते. सोलापूर शहर बुरुड समाजातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात त्यांच्या मागे दोन भाऊ, एक बहिण, दोन मुले,दोन मुली,सुना, जावई व नातवंडे असा परिवार आहे.

# रवीशकुमार, मोहन आगाशे, झेलम परांजपे यांना यंदाचा छाया-प्रकाश फाऊंडेशन पुरस्कार जाहीर

- ज्येष्ठ कवी नारायण कुलकर्णी यांचा साहित्य सेवेबद्दल गौरव
- दिवंगत सुहास शहा उद्योजकता पुरस्कारासाठी बोरामणीच्या माळगे यांची निवड

**सुराज्य/सोलापूर**

**छाया-प्रकाश फाउंडेशनतर्फे विविध क्षेत्रातील मान्यवरांना प्रतिवर्षी दिल्या जाणाऱ्या पुरस्कारांची घोषणा फाउंडेशनचे अध्यक्ष, दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती (निवृत्त) अजित शहा यांनी केली असून ज्येष्ठ रंगकर्मी पद्मश्री डॉ. मोहन आगाशे यांना अभिवंदन पुरस्कार, मॅगसेसे पुरस्कार विजेते रवीशकुमार यांना सव्यसाचि पत्रकार पुरस्कार, ओडिसी नृत्यांगना झेलम परांजपे यांना कलाकौस्तुभ पुरस्कार देण्यात येईल. एक लाख रूपये प्रत्येकी आणि मानपत्र असे त्याचे स्वरूप आहे.**



रवीशकुमार मोहन आगाशे झेलम परांजपे नारायण कुलकर्णी अनिता माळगे

सोलापूरचे ज्येष्ठ साहित्यिक-कवी नारायण कुलकर्णी यांनी केलेल्या प्रदीर्घ साहित्यसेवेबद्दल त्यांचा यावेळी गौरव केला जाणार आहे. बडोद्याच्या भाषा संशोधन प्रकाशन केंद्राचे प्रमुख, ज्येष्ठ विचारवंत डॉ. गणेश देवी यांच्या हस्ते या पुरस्कारांचे वितरण शुक्रवार, दि. २३ डिसेंबर २०२२ रोजी सायंकाळी पाच वाजता होटगी रस्त्यावरील पंचतारांकित हॉटेल बालाजी सरोवरच्या सभागृहात होणार आहे. पुरस्कार प्रदान सोहळ्यानंतर सोलापूरचे सुपुत्र आणि चतुरस्त्र लेखक अच्युत गोडबोले या सर्व मान्यवरांशी दिलखुलास संवाद साधणार आहेत. याखेरीज पंढरपूर तालुक्यातील वाडीकुरोली-धोंडेवाडीच्या वसंतराव प्रशालेतील क्रीडाशिक्षक संतोष विलास पाटील यांना शिक्षक गौरव तर माळशिरस तालुक्यातील कदमवस्ती प्राथमिक शाळेतील शिक्षिका वैशाली आबासाहेब जगताप यांना शिक्षिका गौरव पुरस्कार दिला जाणार आहे. रु. ५० हजार प्रत्येकी आणि मानपत्र असे त्याचे स्वरूप आहे. यावर्षी स्वयंसेवी संस्थांसाठी दिला जाणारा ऊर्जा पुरस्कार इंडियन कॅन्सर सोसायटी, सोलापूर (रु. एक लाख) आणि जिल्हा पेन्शनर्स असोसिएशन, सोलापूर (रु.७५ हजार) या संस्थांना दिला जाणार आहे. यंदाच्या वर्षापासून दिवंगत सुहास शहा यांच्या स्मरणार्थ उद्योजकता पुरस्कार दिला जाणार असून पहिल्या पुरस्काराच्या मानकरी ठरल्या आहेत. दक्षिण सोलापूर तालुक्यातील बोरामणीच्या यशस्विनी अँग्रो प्रोड्युसर कंपनीच्या संस्थापिका अनिता माळगे. त्यांना दिल्या जाणाऱ्या पुरस्काराचे स्वरूप आहे रु. ५० हजार आणि मानपत्र. साहित्य आणि सामाजिक क्षेत्रासाठी विशेष संशोधन करणाऱ्या अभ्यासकाला दिली जाणारी ५० हजार रूपयांची अभ्यासवृत्ती यंदा नितीन वैद्य यांना दिली जाणार आहे. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त स्वातंत्र्यशाहीर कुंजविहारी तथा हरिहर गुरूनाथ सलगरकर यांच्या कवितेचा ते अभ्यास करणार आहेत.

फाऊंडेशनतर्फे २०२२ या वर्षाकरिता १५ हजार ते ५० हजार रुपयांपर्यंत सात लाख २५ हजार रुपयांच्या शिष्यवृत्तींचे वाटप २७ विद्यार्थ्यांना करण्यात येत आहे. या समारंभास उपस्थित राहावे, असे आवाहन स्वाती अजित शहा, प्रेरणा गांधी, मालविका शहा-सेन यांनी केले आहे.

## पैशांची मागणी करुन महिलेचा विनयभंग

**सुराज्य/बार्शी**

बार्शी तालुक्यातील एका प्राथमिक आरोग्य केंद्रात कंत्राटी सेविका म्हणून काम करणारी महिला दुचाकीवरून बार्शी कडे येत असताना तिला ओळखिच्या इसमाने गाठून पैशाची मागणी केली न दिल्याने तीच्याशी झोंबझोंबी केल्याने तालुका पोलिसात एकावर गुन्हा दाखल केला आहे.

ही घटना बार्शी पानगाव रोडवरील सौदरे गावाजवळ ९ डिसेंबर रोजी रात्री ८.३० वाजता होऊन याबाबत सदर महिलेंनी तालुका पोलीसात ११ रोजी तक्रार देताच लक्ष्मण विठ्ठल नाईकवाडी (रा.पानगाव ता.बार्शी) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की ही महिला आरोग्य केंद्रात कंत्राटी सेविका म्हणून गेली सात वर्षपासून काम करत असून काम संपल्यानंतर ती बार्शीतील तिच्या भावाकडे दुचाकीवर जात असताना सौंदरे गावाजवळ तिला आडवून त पैशाची मागणी करून दिले नाहीतर तुझ्याविरुद्ध खोट्या तक्रारी करून नोकरी घालविन्याची धमखी देऊन तिने पैसे देण्यास नकार दिल्याने तिचा हात ओढुन अंगाशी झोंबझोबी करून शारिरिक सुखाची मागणी केली. अशी तक्रार दाखल केली आहे. पुढील तपास पो.नाईक आप्पासाहेब लोहर करत आहेत.

## ठाकरे सेनेच्या वतीने बाळे परिसरात बंद पाळला जाणार

**सुराज्य/सोलापूर**

महापुरूषाच्या बदनामीच्या विरोधात १६ डिसेंबर रोजी बंद पाळला जाणार आहे. याला उध्दव बाळासाहेब ठाकरे सेनेच्या वतीने बाळे परिसरात कडकडीत बंद पाळला जाणार आहे. यासंदर्भात बाळे चौक व्यापारी संघटनेची सर्व सभासदांची शिवसेनेचे आबा सांवत यांनी बैठक घेऊन या बंद सहभागी होण्याचा निर्णय घेतला तरी बाळे परिसरात कडकडीत बंद पाळत संघटनेच्या सर्व सभासदांनी या बंद मध्ये सहभागी होऊन सहकार्य करावे असे आवाहन सावंत यांनी केले

## शाई फेकप्रकरणी भीम आर्मीच्या शहराध्यक्षावर गुन्हा दाखल

**सोलापूर** : सम्राट चौक परिसरातील न्यू बुधवार पेठ येथील बुद्धराष्ट्र प्रतिष्ठान यांच्यावतीने सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळ्यात आ.विजयकुमार देशमुख यांच्यावर शाईफेक केल्या प्रकरणी भीम आर्मीचे शहराध्यक्ष अजय मैंगर्दीकर (वय-२५. रा.मातोश्री रमाबाई, आंबेडकर नगर, न्यू बुधवार पेठ)याच्यावर जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विवाह सोहळ्या विजयकुमार देशमुख हे प्रमुख पाहुणे होते. ते त्याठिकाणी गेले असता आदेशमुख यांच्या अंगावर शाई फेकण्यात आली.त्या ठिकाणी मोठा बंदोबस्त असल्याने त्या युवकास तात्काळ ताब्यात घेण्यात आले पोलीस ठाण्यात आणून त्याची विचारपूस केली असता, त्यांनी आपण भीम आर्मीचे शहराध्यक्ष असल्याचे सांगितले. त्यानुसार जोडभावी पेठ पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक विजय जाधव यांनी फिर्याद दिली. पुढील तपास पोसई ताकभाते हे करीत आहेत.

## सात दिवसापूर्वी दोन कारच्या धडकेत तिघे जखमी

### १० लाख नुकसानप्रकरणी कार चालकावर गुन्हा

**सुराज्य/बार्शी**




बार्शी वैराग रोडवरील पानगाव जवळ सहा दिवसापूर्वी एका कारनी भरधाव वेगाने येऊन समोरच्या कारला धडक देऊन एका कारमधील तिघेजण जखमी करून त्यात दोन्ही कारचे१० लाख रु.चे नुकसान होण्यास कारणीभूत म्हणून एकावर तालुका पोलिसात आज गुन्हा दाखल केला आहे.

महेश सुरेश आडसुळ रा.शेळगाव आर.यानी तक्रार देताच पोलीसानी एम.एच.१३ बी.एन.३८८% चा कार चालक ओंकार मधुसूदन क्षीरसागर रा.बाळे सोलापूर याच्या विरुद्ध तक्रार देताच गुन्हा दाखल केला आहे. हा अपघात ६ डिसेंम्बर २२ रोजी होऊन यात फिर्यादी महेश अडसूळ, भाऊ सुहास व चुलते सज्जन अडसूळ हे जखमी, झाले होते या दीवशी शेळेगाव येथून बार्शी येथून ५०० रुचा स्टॅम्प आनण्यासाठी त्याच्या कारमधून बार्शीकडे रोडच्या कडेनी येत असताना पानगाव जवळ येताच बार्शीकडून येणारी एम.एच.१३ बी.एन.३८८७ या कारने समोरून धडक दिल्याने हे तिघे जखमी झाले त्यात जखमींना बार्शी येथे प्रथम उपचार करून जखमींना ७ रोजी दवाखाण्यात दाखल करून अजुनही उपचार सुरू असताना आज फिर्यादीने येथे येऊन ही तक्रार दाखल केली आहे. पुढील तपास तालुका पोलीस करत आहेत.




## कृषीदुतांकडून मका पिकावरील लष्करी अळी नियंत्रणासाठी प्रात्यक्षिक

**सुराज्य/दक्षिण सोलापूर**

यावर्षी मका पिकाची लागवड मोठ्या प्रमाणात झाली आहे. परंतु या पिकावर नवीन लष्करी अळीचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात आढळून येत आहे.म्हणुनच लोकमंगल कृषी महाविद्यालय, वडाळा अंतर्गत ग्रामीण जागरुकता कार्यानुभव कार्यक्रमातंर्गत, येळेगाव द. सोलापुर येथे मका पिकातील किटक नियंत्रणाविषयी कृषीदुतांनी मार्गदर्शन केले. सततच्या किटकनाशकांच्या वापरामुळे किटकांमध्ये प्रतिरोधक क्षमता वाढलेली आहे. किटकनाशकांच्या वापराशिवाय मका पिकातील किड व अळी नियंत्रण करू शकतो, याविषयी मार्गदर्शन केले.बऱ्याच भागांमध्ये चाऱ्यासाठी उन्हाळ्यात मका पिकाची लागवड केली जाते. त्याचा उपयोग मुरघास करण्यासाठी देखील केला जातो.

सध्या या पिकावर लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. काही शेतकरी या अळीच्या नियंत्रण व्यवस्थापनासाठी कीटकनाशकांचा वापर करतात. परंतू असा चारा जनावरांना खाऊ घातल्यास कीटकनाशकांचे अवशेष त्यांच्यामार्फत जनावरांच्या पोटामध्ये जाण्याची शक्यता असते.तसेच दुधामध्ये देखील कीटकनाशकांचा अंश उतरण्याची शक्यता असते. चाऱ्यासाठी मका पिकाचे व्यवस्थापन काटेकोर व जागरूकपणे करणे गरजेचे आहे. त्यामध्ये कामगंध सापळ्यांचा वापर करून किडींचे नियंत्रण तर होतेच सोबतच किडींच्या प्रादुर्भावाचे प्रमाण देखील तपासता येते, त्यामध्ये कामगंध सापळ्याचा वापर कसा करावा याविषयाचे प्रात्यक्षिक करून दाखविले.

यासाठी लोकमंगल कृषी महाविद्यालय, वडाळा येथील प्राचार्य डॉ.सचिन फुगे व किटकशास्त्र विषयतज्ञ प्रा. रविंद्र पालकर यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. यावेळी कृषीदुत कल्पेश पाटील, राहुल शिंगे, सौरभ मत्रे, गितेश पवार,जसवंत रेड्डी, व आदर्श गौड यांचा सहभाग होता. यावेळी प्रगतशील शेतकरी बसवंत सर्वडि, श्रीकांत सार्वडे, सुरेश सर्वडि, शिवानंद पाटील यांसोबत १५ शेतकरी उपस्थित होते. या प्रात्यक्षिकाला शेतकऱ्यांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

## बदलत्या वातावरणामुळे रुग्णसंख्येत वाढ

**सुराज्य/चिखली**

मोहोळ तालुक्यात गेल्या आठवड्यापासून पारा घसरला असून हवेत गारवा जाणवू लागला आहे. सतत बदलणाऱ्या वातावरणामुळे रुग्णसंख्येत वाढ झाली आहे. सध्या चिखली, हिवरे, यावली, वडाचीवाडी, देवडी आदी भागातील नागरिकांना सर्दी, खोकला, ताप, घशाची खवखव अशा आजारांचा सामना करावा लागत आहे. काहींच्या ताप, सर्दी, घशाची खवखव, खोकल्यांच्या रूग्णांमध्ये २० ते २५ टक्क्यांनी वाढ झाली आहे.

याशिवाय हवेत काहीसा गारवा निर्माण झाल्याने त्वचा देखील कोरडी पडली जाते. त्वचा सोबत समस्या देखील वाढल्याने रूग्ण संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे दिवसभर ढगाळ वातावरण तर कधी कडक ऊन आणि त्यात बोचरी थंडी या बदलत्या वातावरणाचा फटका देखील लहानांपासून ते थेट वयोवृद्धांना बसत आहे. त्यामुळे लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, गरोदर महिला यांना या वातावरणाचा त्रास जास्त जाणवत असून खाजगी दवाखान्यात सर्दी, खोकला, घशाची खवखव, ताप आदी आजारांच्या रुग्ण संख्येत वाढ झाल्याचे डॉक्टरांकडून सांगण्यात येत आहे. अशा परिस्थितीत नागरिकांनी योग्य आहार, विहारासह पाणीही उकळून प्यावे तसेच दिवसभर कोमट पाणी घ्यावे याचबरोबर थंड पदार्थांचे सेवन टाळावे, यासाठी आरोग्याची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे असा देखील सल्ला डॉक्टरांकडून देण्यात येत आहे.



## जनक्रांती संघटना, श्रीनाथ विद्यालयाकडून आर्थिक मदत

**सुराज्य/श्रीपूर**

जनक्रांती संघटना माळशिरस तालुका व श्रीनाथ विद्यालय बोरगाव यांच्या वतीने गरीब विद्यार्थ्याच्या आईसाठी एकूण निधी ३८ हजार ५०० रुपये हा निधी आदित्य गुरव व डॉक्टर नागनाथ दगडे यांच्याकडे सुपूर्द केला.

यावेळी भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य राजकुमार पाटील, पृथ्वीराज पाटील, श्रीनाथ विद्यालय बोरगावचे मुख्याध्यापक कांबळे के टी, उपमुख्याध्यापक भुजबळ एम एस, वर्गशिक्षक लेंडवे डी एम, डॉक्टर नागनाथ दगडे, सुनील भगत, अमित देशमुख आदी यावेळी उपस्थित होते. माळखांबी तालुका माळशिरस येथील तरुण आदित्य बजरंग गुरव हा विद्यार्थी इयत्ता नववी ब मध्ये शिकत आहे. तो माळखांबी गावचे आराध्य दैवत हनुमान मंदिर येथे पुजारी म्हणून सेवा करीत आहे. सध्या मुलगा आणि आई हनुमान देवाची सेवा करून माळखांबी ग्रामस्थांच्या आधारावर जीवन जगत आहेत. आदित्यची आई कमल बजरंग गुरव या फुफ्फुसाच्या आजाराने त्रस्त असून त्या अकलूज येथील अकलाई आयु शू हॉस्पिटलमध्ये मध्ये औषध उपचार घेत आहेत

उपचारासाठी तीन लाख रुपयांची गरज असून ज्यांना कोणाला सहकार्य करायचे आहे आशा दानशूर ग्रामस्थांनी आदित्य बजरंग गुरव व डॉक्टर नागनाथ दगडे यांच्याकडे मदत देऊन सहकार्य करावे, असे आवाहन भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य राजकुमार पाटील यांनी केले आहे.

# 'मातृभूमी'सारख्या संस्था निर्माण व्हाव्यात : दळवी

### मातृभूमी प्रतिष्ठानच्यावतीने उच्चपदी पदोन्नती व नेमणूक मिळालेल्या बार्शीच्या सुपुत्रांचा नागरी सत्कार



**बार्शी** : शहराच्या विकासाचा वेग वाढलाय, शहरे बदलताहेत. सरकार शहराच्या विकासाचे आराखडे तयार करत आहेत. पुढील १५ वर्षात देशातील सर्व शहरे आंतरराष्ट्रीय दर्जाची होतील. या देशात ६ लाख ४८ हजार खेडी आहेत. पण या गावांचा सर्वांगीण विकास कधी होणार? त्यासाठी गावातील अधिकारी, व्यावसायिक, नागरिक, संस्था या सर्वांनी आपआपल्या गावांच्या विकासासाठी एकत्र येण्याची गरज आहे. मातृभूमी प्रतिष्ठानचे मॉडेल हे प्रत्येक गावामध्ये राबवले पाहिजे. असे प्रतिपादन सेवानिवृत्त विभागीय आयुक्त चंद्रकांत दळवी यांनी अध्यक्षीय मनोगतात केले. येथील मातृभूमी प्रतिष्ठानच्यावतीने आयोजित शासनाच्या उच्चपदी पदोन्नती व नेमणूक मिळालेल्या बार्शीच्या सुपुत्रांच्या नागरी सत्कार सोहळयात ते बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून पुणे विभागीय आयुक्त सौरभ राव हे होते. यावेळी मातृभूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष ठोंबरे, प्रांताधिकारी हेमंत निकम यांच्यासह सत्कारमूर्ती व्यासपीठावर उपस्थित होते. प्रास्ताविक साखर सहआयुक्त संतोष डुरे-पाटील यांनी केले.मुख्यमंत्री कार्यालयाचे सहसचिव व्यंकटेश भट, उपमुख्यमंत्री कार्यालयाचे सहसचिव संतोष पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले. अध्यक्ष संतोष ठोंबरे यांनी स्वागत केले. उपाध्यक्ष विनय संघवी, सचिव प्रताप जगदाळे, अजित कुंकुलोळ यांनी प्रमुख पाहुणे व अध्यक्षांचा सत्कार केला. आभार किरण गाढवे यांनी मानले.

**या मान्यवरांचा झाला सन्मान :** मुख्यमंत्री कार्यालयाचे सहसचिव व्यंकटेश भट, उपमुख्यमंत्री कार्यालयाचे सहसचिव संतोष पाटील, सहआयुक्त राज्यकर जीएसटी प्रकाश शेळके, सिडको नवी मुंबई येथील वित्त व लेखा संचालक धनराज गरड, राज्याच्या विरोधी पक्षनेत्याचे विशेष कार्यकारी अधिकारी अविनाश सोलवट, सार्व.आ.विभाग अवर सचिव सुनिल उकिरडे, सहकार संस्था दुग्ध सहनिबंधक शहाजी पाटील, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी रविंद्र माने, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी बालाजी ताटे या बार्शी शहर व तालुक्यातील उच्चपदावरी प्रशासकीय अधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

**योगदानासाठी देणगीदारांनी पुढे यावे : सोलवट** - अविनाश सोलवट म्हणाले, मातृभूमीचे रोपटे वाढत आहे. लोकवर्गणीतून साडेतीन कोटी जमले आहेत. त्या माध्यमातून लोकोपयोगी काम उभे करायचे आहे. अजून १ कोटी रूपयांची गरज आहे. यासाठी नागरिकांनी योगदान दयावे असे आवाहन करत यातून उभारलेल्या कामाचा पुढील पिढीला लाभ होईल असे सांगितले.



## महानगरपालिका आयोजित शालेय क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन

सुराज्य/सोलापूर : सोलापूर महानगरपालिका सोलापूर अंतर्गत जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रिडा परिषद सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने शहरस्तरीय शालेय क्रिडा स्पर्धेचे आयोजन ग्रामीण पोलीस मुख्यालयाच्या मैदानावरती आयोजित करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्घाटन पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी प्रमुख म्हणून महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजय खोराटे उपस्थित होते. यावेळी पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांनी दोन दिवसीय चालणाऱ्या क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी उपायुक्त मच्छिंद्र घोलप, प्राचार्य राजू प्याटी, क्रीडा अधिकारी मुर्तुजा शहापुरे, विभागीय अधिकारी बाळासाहेब लामखाने, जिल्हा क्रिडा अधिकारी नितीन ताराळकर, पोलीस निरीक्षक आनंद काजुळकर, क्रीडा शिक्षक संघटना अध्यक्ष दशरथ गुरव, प्रकाश गायकवाड, सुनील चव्हाण, एकनाथ पवार, सुलोचना गवळी, रवी राठोड, संतोष म्हेत्रे, केतन माशाळ आदी उपस्थित होते.

## शालेय अंध मुलांच्या राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धेचे आयोजन

सुराज्य/सोलापूर: राष्ट्रीय दृष्टीहीन संघ महाराष्ट्राच्यावतीने दरवर्षी अंध कल्याण व शैक्षणिक सप्ताहाचे आयोजन केले जाते. राष्ट्रीय दृष्टीहीन संघ महाराष्ट्र जिल्हा शाखा सोलापूरच्यावतीने रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त शालेय अंध मुलांच्या राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धेचे आयोजन प्रथमच १५ ते १८ डिसेंबर दरम्यान रेल्वे मैदान भैय्या चौक येथे करण्यात आले असल्याची माहिती महासचिव राजू शेळके यांनी पत्रकार परिषदेत दिली.

५ डिसेंबर रोजी सकाळी अकरा वाजता स्पर्धेचे उद्घाटन महापालिका आयुक्त शितल तेली-उगले, मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी, निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार, समाज कल्याण अधिकारी सुनील खमितकर, अभय दिवानजी, दमानी विद्या मंदिरचे अध्यक्ष नंदकिशोर भराडीया यांच्या हस्ते होणार आहे. स्पर्धेत राज्यातून १५ अंधशाळांचे संघ सहभागी होणार आहेत. सर्व स्पर्धा साखळी पद्धतीने खेळविल्या जाणार आहेत. यात एकूण दहा षटकाचे १८ सामने होणार आहेत.

या स्पर्धेसाठी सोलापूर महानगरपालिका, समाज कल्याण, जिल्हा परिषद सोलापूर, झुआरी सिमेंट हेंडलबर्ग ग्रुप सोलापूर, भारतीय स्टेट बँक, आदित्य बिर्ला अल्ट्राटेक सिमेंट, बालाजी अमाइन्स, प्रसिजिन फाउंडेशन, बँक ऑफ बडोद, बँक ऑफ महाराष्ट्र यांचे सहकार्य लाभले आहे. १८ डिसेंबर रोजी स. ११ वाजता बक्षीस वितरण खासदार जयसिद्धेश्वर महास्वामी यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमास जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, डॉ. सुहासिनी शहा उपस्थित राहणार असल्याचे शेळके यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस प्रभाकर कदम, अंजली शेळके, आशिष खलगे उपस्थित होते.

## प्रा.नितीन बानगुडे-पाटील यांचे शनिवारी व्याख्यान

सुराज्य/सोलापूर : सोलापूर जिला माहेश्वरी सभा व नीलकंठ को. ऑफ बँक लिमिटेड सोलापूर यांच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रातील ख्यातनाम वक्ते लेखक-इतिहास अभ्यासक प्रा. नितीन बानगुडे-पाटील (सातारा) यांचे 'युवा : काल-आज-उद्या' या विषयावर शनिवार दि. १७ डिसेंबर रोजी सायं. ५ वाजता हुतात्मा स्मृती मंदिर पार्क चौक येथे व्याख्यान आयोजित करण्यात आले असल्याची माहिती सोलापूर जिला माहेश्वरी सभेचे अध्यक्ष जवाहर जाजू यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सोलापूर जिला माहेश्वरी सभा यांच्यावतीने सोलापूरची कन्या कीर्ती नंदकिशोर भराडिया वरळी सिंकल लिंक ते गेटवे ऑफ इंडिया हे समुद्रीमार्गे ३८ किलोमीटरचे अंतर स्विमिंग करून विश्वविक्रम केला आहे. यानिमित्त तिचा सोलापूर माहेश्वरी समाजरत्न पुरस्कार देऊन प्रा. नितीन बानगुडे-पाटील यांच्या हस्ते स्मृतीचिन्ह देऊन सन्मान केला जाणार आहे. याप्रसंगी महाराष्ट्र प्रदेश माहेश्वरी सभेचे अध्यक्ष श्रीकिसन भन्साळी व सचिव मदनलाल मनियार यांची प्रमुख उपस्थिती असणार असल्याचे जाजू यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस चेअरमन चंद्रकांत तापडिया, मधुसूदन कालाणी, धनराज नोगजा आदी उपस्थित होते.

## व्हिक्टर युथ फेडरेशनतर्फे सामुदायिक विवाह सोहळा

सुराज्य/सोलापूर : व्हिक्टर युथ फेडरेशन इज्जेतमाई शादी कमिटीच्यावतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही मुस्लीम समाजातील ५१ जोडप्यांचा सामुदायिक विवाह सोहळा मंगळवार २८ फेब्रुवारी २०२३ रोजी करण्यात येणार असल्याची माहिती बखत्यार सय्यद यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी सय्यद म्हणाले, 'सामाजिक विवाह सोहळ्यामध्ये सहभागी होणाऱ्या वधू वरास पाच हजार रुपये नोंदणी फी असणार आहे. तसेच संस्थेच्यावतीने संसारोपयोगी वस्तू देण्यात येणार आहेत. वधू-वराकडून येणाऱ्या प्रत्येक १०० पाहुण्यांची जेवणाची व्यवस्था करण्यात आल्याचे सय्यद यांनी यावेळी सांगितले. या पत्रकार परिषदेस शकील बागवान, इस्माईल शेख, सत्तार नदाफ, जाकीर शेख आदी उपस्थित होते.

## आर्यमान रायफल-पिस्तूल शुटींग क्लब येथे जिल्हास्तरीय नेमबाजी स्पर्धा

सुराज्य/पिलीव : माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील आर्यमान पिस्तूल शुटींग क्लब येथे २०२२- २३ च्या जिल्हास्तरीय नेमबाजी स्पर्धा संपन्न झाल्या. या स्पर्धेचे उद्घाटन श्रीश्री सद्गुरु साखर कारखान्याचे चेअरमन एन. शेषागिरीराव, जिल्हा क्रिडा अधिकारी सुनील धारुरकर यांच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्धेत सोलापूर जिल्ह्यातील १४० खेळाडूंनी सहभाग नोंदवला. सदर स्पर्धा १४,१७,१९ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी ठेवण्यात आल्या होत्या. या स्पर्धेमधून वेगवेगळ्या वयोगटातून ५४ खेळाडूंची अहमदनगर येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धे साठी निवड करण्यात आली. यामध्ये आर्यमान शुटींग क्लबच्या वैष्णवी खटावकर, सई देशमुख, सना तांबोळी, सनम शेख, सिद्धी राजमाने, तमसीन शेख, शौर्य धनवडे, यशराज गुजरे, प्रतीक्षा कोपनर, विश्वजित गुजरे, किरण राजमाने, वैष्णवी तांबवे, अथर्व राजमाने, तुषार वाघमारे, अर्जुन राजमाने, प्रतीक राऊत, धनश्री पडळकर यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. सर्व विद्यार्थ्यांना प्रशिक्षक आकाश गुजरे यांचे मार्गदर्शन लाभले.

# जयहिंदकडून नोव्हेंबरपर्यंतची ऊसबिले अदा : माने-देशमुख

सुराज्य/अक्कलकोट

**आचेगाव (ता. दक्षिण सोलापूर) येथील जयहिंद शुगरच्यावतीने यंदाच्या गळीत हंगामात १ ते १५ नोव्हेंबरपर्यंत ऊस पुरवठा केलेल्या शेतकऱ्यांच्या खात्यावर पहिल्या हप्त्यापोटी प्रतिटन २२५० रूपये प्रमाणे रक्कम अदा केले असल्याचे कारखान्याचे चेअरमन ~~गणेश माने देशमुख यांनी~~ सांगितले.**

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही शेतकऱ्यांना दिलेल्या शब्दास अनुसरून कारखान्याकडून बिल वेळेवर अदा करण्यात येत आहे. यासोबतच वाहतूकदार, ठेकेदार यांचीही बिले अदा केल्याचे माने देशमुख यांनी सांगितले.

जयहिंद शुगरकडून नेहमीच शेतकऱ्यांच्या हितासाठी विविध उपाययोजना राबविल्या जातात. २६५ वाण असलेल्या ऊस पुरवठादार शेतकऱ्यांना २ हजार २११ रुपयांची पहिली उचल दिल्याचे त्यांनी सांगितले.

यावर्षीही दिलेल्या शब्दाप्रमाणे ऊस बिल अदा केल्याने ऊस पुरवठादार शेतकऱ्यांमधून समाधान व्यक्त होत आहे. यावेळी कारखान्याचे कार्यकारी संचालक बब्रुवान माने देशमुख, व्हा. चेअरमन विक्रमसिंह पाटील, व्यवस्थापकीय संचालक आर. पी. देशमुख, शेतकी अधिकारी जेऊरे आदी उपस्थित होते.



दि. १५ नोव्हेंबरपर्यंत पुरवठा केलेल्या शेतकऱ्यांचे ऊस बिल अदा केले आहे. यंदाचा गाळप हंगाम यशस्वीपणे सुरू असून दररोज साधारणतः ९००० मेट्रिक टन गाळप होत आहे. शेतकऱ्यांनी परिपक्व ऊसाचा पूरवठा कारखान्यास करावा. यातून कारखान्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आर्थिक फायदा मिळणार असल्याचे जयहिंद शुगरचे चेअरमन गणेश माने देशमुख यांनी म्हणाले.

# अल्पवयीन मुलीला अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवले

सुराज्य/मंगळवेढा

**मंगळवेढा तालुक्याच्या ग्रामीण भागातून एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलीला अज्ञात व्यक्तीने फुस लावून पळवून नेल्याची घटना घडली असून या प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे.**

या घटनेची हकिकत अशी, यातील फिर्यादी व त्यांची पत्नी दि. ११ डिसेंबर रोजी सकाळी १० वा. शेतावर कामावर गेले होते. सदर वेळी घरामध्ये फिर्यादीच्या दोन्ही मुली होत्या. यातील फिर्यादी पती पत्नी सायंकाळी ६ वा. घरी आले. तेव्हा १७ वर्षीय मुलगी घरी दिसून आली नाही. याबाबत अन्य दुसऱ्या मुलीकडे चौकशी केली असता ती अर्ध्या तासापूर्वी मैत्रिणीच्या घरी जाते म्हणून निघून गेली असल्याचे सांगितले. पालकांनी रात्री ७ पर्यंत त्या मुलीची वाट पाहिली, मात्र ती घरी आली नाही. मैत्रिणीच्या घरी व आजूबाजूला तीचा शोध घेतला असता ती मिळून आली नाही.

फिर्यादीची खात्री पटली की अज्ञात कारणावरून अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेली असल्याने अज्ञात व्यक्तीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तिचे वर्णन पुढीलप्रमाणे-

अंगात हिरव्या रंगाचा टी शर्ट, जीन पँट, काळया रंगाची ओढणी, कानात झुबे, सोबत मंगळसूत्र, अंगाने मध्यम, शिक्षण १२ वी अशा वर्णनाची मुलगी कोणाच्या निदर्शनास आल्यास त्यांनी बोराळे बीटचे तपासिक अंमलदार पोलीस हवालदार महेश कोळी यांचेशी संपर्क साधवा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## आंधळगाव येथे शॉक लागून तरूणाचा मृत्यू

सुराज्य/सोलापूर : आंधळगाव येथे बोअरची मोटर चालू करण्यास गेलेल्या एका २२ वर्षीय तरूणास शॉक लागून मृत्यू झाल्याची घटना घडली असून मोहित सुनील वेळापुरे असे मयत तरूणाचे नाव आहे. दरम्यान, या घटनेची मंगळवेढा पोलिसात अकस्मात मयत अशी नोंद झाली आहे.यातील खबर देणारे सुनील कोंडीबा वेळापुरे यांचा मुलगा मयत मोहित सुनील वेळापूरे हा दि.१३ रोजी दुपारी ३.४५ पूर्वी विलासचंद कोंडीबा वेळापुरे यांच्या शेतात बोअरची मोटर चालू करण्याकरिता घरासमोरील इलेक्ट्रिक खांबावरील पेटीकडे गेला असता त्यास पेटीचा शॉक लागल्याने तो मयत झाला असल्याचे दिलेल्या खबरमध्ये म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.

### शेवरे येथे दुचाकीवरील जावई ठार

सोलापूर-मुलगी आणि जावयाला दुचाकीवरून सोडण्यासाठी ट्रीपल सिट जाताना पाठीमागून टेम्पो धडकल्याने जावई ठार तर सासरे आणि मुलगी किरकोळ जखमी झाले. हा अपघात शेवरे (ता.माढा) येथे मंगळवारी सकाळच्या सुमारास घडला. विजय शंकर साठे (वय ४४ रा.वेळापूर ता.माळशिरस) असे मयताचे नाव आहे. ते काल सकाळी ११ वाजेच्या सुमारास वडशिवणे (ता.करमाळा) येथून सासरे सुभाष अर्जुन लोंढे (वय ६५ रा.वडशिवणे) यांच्या दुचाकिच्या पाठीमागे पत्नी सगुणा हिच्यासह बसून वेळापूर येथे आपल्या गावी निघाले होते. टेंभुर्णी ते अकलूज रोडवरील शेवरे गा-वाजवळ पाठीमागून एमएच४५-एएफ-५३५५ या क्रमांकाचा टेम्पो धडकल्याने विजय साठे हे चाकाखाली सापडून गंभीर जखमी होऊन मरण पावले.तर दोघे किरकोळ जखमी झाले.

### पैशाच्या वादातून रॉडने मारहाण

सदर बाजार परिसरातील१४ नंबर शाळेजवळ पैसे देण्या घेण्याच्या वादातून लोखंडी रॉडने केलेल्या मारहाणीत रमेश राणुसिंग शिवसिंगवाले (रा.लष्कर,उ.स. बजार) हा तरुण जखमी झाला. ही घटना बुधवारी दुपारच्या सुमारास घडली. त्याला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. राहुल फटफटवाले, आकाश बऱ्हाणपुरे आणि त्याच्या साथीदाराने मारहाण केली. अशी नोंद सदर बझार पोलिसात झाली आहे.

### दुचाकीच्या धडकेने दोघे जखमी:१ गंभीर

रंगभवन ते बेरडपूल या रस्त्यावरील शितलादेवी मंदिर चौकाजवळ दुचाकींची समोरासमोर धडक झाल्याने विकि हरिश्चंद्र बाबावाले (वय २३) आणि रवी गोपाल लंबूवाले (वय २८ दोघे रा.बेरड पूल, लष्कर) हे जखमी झाले. हा अपघात बुधवारी दुपारी चार वाजेच्या सुमारास घडला. त्यांना उपचारासाठी शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यापैकी विकि बाबावाले याची प्रकृती गंभीर आहे.

## महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्तपदी संदीप कारंजे यांची नियुक्ती

**महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाने काढला आदेश**

सुराज्य/सोलापूर



सोलापूर महापालिकेच्या आस्थापनेवरील नगर अभियंता संदिप कारंजे यांची सोलापूर महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त पदावर निवडीने नियुक्ती करण्यात असल्याचा शासन आदेश बुधवारी काढला आहे. महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाचे उप सचिव अनिरुध्द जेवळीकर यांच्या स्वाक्षरीने हा शासन आदेश काढला.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३९ अ तसेच कलम ४५ अन्वये शासनास असलेल्या अधिकारास अनुसरून सोलापूर महानगरपालिकेच्या नगर अभियंता या पदी कार्यरत असलेले संदिप कारंजे यांची सोलापूर महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त या पदावर निवडीने पदस्थापना करण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे. नगर अभियंता संदिप भिमाशंकर कारंजे हे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ४५ अंतर्गत सोलापूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कार्यरत असलेले एकमेव अधिकारी असल्याने अतिरिक्त आयुक्तपदाच्या निवडीसाठी त्यांचा विचार करण्यात आला आहे. सध्या नगर अभियंता असलेले संदीप कारंजे

# श्रीपूरमध्ये कडकडीत बंद

सुराज्य/श्रीपूर

श्रीपूर तालुका माळशिरस येथे राज्याचे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, आमदार प्रभात लोढा यांनी महाराष्ट्र राज्याचे दैवत छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, म. ज्योतिबा फुले, कर्मवीर भाऊराव पाटील या राष्ट्रपुरुषाबद्दल काढलेल्या निंदनीय वक्तव्याचा श्रीपूर येथे राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना, बहुजन आघाडी, काँग्रेस आय यांच्यावतीने जाहीर निषेध करण्यात आला.

यावेळी श्रीपूर बंदची हाक देण्यात आली होती. त्यास व्यापाऱ्यांनी प्रतिसाद देऊन कडकडीत दिवसभर बंद पाळून



पाठिंबा दिला.

त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकामध्ये राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, आमदार मंगल प्रभात लोढा यांच्या प्रतिमांचे दहन करण्यात आले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे विक्रम सिंह लाटे, मौला पठाण, आरपीआयचे शामराव भोसले, सतीश लांडगे, अशोकराव चव्हाण, शिवसेनेचे नितीन वाघमारे, वंचित बहुजन आघाडीचे संदीप घाडगे, किशोर गाडे, बी. टी शिवशरण, सावता भोसले, राज आठवले, बापूसाहेब पोळके, राजरत्न नाईकनवरे, ज्ञानेश्वर सुरवसे, राजू सुरवसे, शैलेश शेंडगे, प्रभाकर सुरवसे, गौतम आठवले, किशोर आठवले, सागर आठवले, बंटी चंदनशिवे, विश्वजीत भालशंकर, सिद्धार्थ जगधने, अर्जुन आठवले, अतिश आठवले, जगदीश डुंगळे, पांडुरंग सोनवने, कपिल घाडगे, गणेश सावंत आदी उपस्थित होते.

# जिल्हाभरात दिव्यांग सक्षमीकरण कार्यशाळा

सुराज्य/सोलापूर

जिल्हा परिषदेच्यावतीने १४ डिसेंबर रोजी जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीत दिव्यांग सक्षमीकरण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळांमध्ये दिव्यांग लाभार्थींची आरोग्य तपासणी, ५ टक्के दिंव्याग निधी वाटप करणे तसेच विविध शासकीय योजनांची माहिती देणे आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

समाज कल्याण अधिकारी सुनील खमितकर यांच्यासह जिल्हा मुख्यालयातील विभाग प्रमुख व गटविकास अधिकारी यांनी या कार्यशाळांना भेटी देऊन



मार्गदर्शन केले. कार्यशाळेत गटविकास अधिकारी, मुख्याधिकारी नगरपालिका ग्रामसेवक यांनी दिव्यांगांनी उपस्थित केलेल्या विविध अडचणींबाबत व दिव्यांगांसाठी असणाऱ्या विविध योजनांबाबत दिव्यांगांना मार्गदर्शन केले.

या अंतर्गत जिल्हा समाज कल्याण अधिकारी सुनील खमितकर व वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता सच्चिदानंद बांगर यांनी मुळेगाव येथे झालेल्या दिव्यांग सक्षमीकरण कार्यशाळेस उपस्थित राहून दिव्यांग बांधवांना दिव्यांगांसाठी असलेला पाच टक्के राखीव निधी, प्राथमिक आरोग्य केंद्रातून आरोग्याची तपासणी करून घेणेबाबत व तसेच प्रौढ दिव्यांगांसाठी असलेल्या कार्यशाळा, स्वयंरोजगारासाठी बीज भांडवल, दिव्यांग अव्यंग विवाह प्रोत्साहन अनुदान योजना याबाबत दिव्यांग बांधवांशी सुसंवाद साधला. याप्रसंगी मुळेगाव येथील सरपंच सविता भोसले, उपसरपंच शिवराज जाधव, ग्रामसेवक रमेश गायकवाड उपस्थित होते.

ग्रामपंचायत वांगी येथे दिव्यांग कार्यशाळेत कामराज सूर्यभान शेळके यांना ग्रामपंचायतमार्फत RO मशीन देण्यात आली. ग्रामपंचायत बेलाटी येथे दिव्यांग सक्षमीकरण कार्यशाळा घेण्यात आली व ५ टक्के निधीचे वाटप करण्यात आले. नरखेड (ता. मोहोळ) येथे दिव्यांग कार्यशाळा, आरोग्य तपासणी, नोंदणी कॅम्प आयोजित करण्यात आला होता. यावेळी बालाजी राजेंद्र गिड्डे यांना पाच टक्के निधीतून ग्रामपंचायत मालवंडीमार्फत लॅपटॉप देण्यात आला.

## अविराज सुळे कुस्ती स्पर्धेत द्वितीय

सुराज्य/पिलीव

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील कर्मवीर भाऊराव पाटील व रमेश खलीपे ज्युनिअर कॉलेजच्या अविराज नागनाथ सुळे याने सोलापूर जिल्हा क्रिडा कार्यालया मार्फत आयोजित करण्यात आलेल्या तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेत १९वर्षे व ६१ किलो वजन गटात फ्री स्टाईल या प्रकारात दुसरा क्रमांक संपादन केला.



या कुस्ती स्पर्धा बागेचेवाडी येथील लोकनेते स्व. पै. दत्ता वाघमारे बहुउद्देशीय संस्थेच्यावतीने संग्रामनगर येथील शिवनेरी तालीमच्या मैदानात आयोजित करण्यात आल्या होत्या.

अविराज याच्या यशाबद्दल त्याला प्रशस्तिपत्र व ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. या यशाबद्दल प्राचार्य एस. डी. कापसे, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख पाटील, स्थानिक स्कूल कमिटी यांच्यासह पिलीव परिसरातील विविध क्षेत्रातील मान्यवर यांच्याकडून अविराज याचे अभिनंदन केले आहे.

# महापालिका राबविणार आजपासून गोवर लसीकरण मोहीम

**शहरात ४२ संशयित रूग्ण; एकाचा अहवाल पॉझिटिव्ह नाही**

सुराज्य/सोलापूर

**आजपर्यंत शहरांमध्ये एकूण ४२ संशयित रुग्ण सापडलेले असून सुदैवाने एकाही रुग्णाचा अहवाल पॉझिटिव्ह आलेला नाही तसेच एकही मृत्यूची नोंद नाही. मात्र खबरदारीचा उपाय म्हणून शासनाच्या मार्गदर्शनानुसार महापालिकेच्यावतीने शहरात गोवर लसीकरण मोहिमेची पहिली फेरी १५ डिसेंबर ते २५ डिसेंबर तसेच दुसरी फेरी दि. १५ जानेवारी ते २५ जानेवारीपर्यंत राबवली जाणार आहे. महानगर पालिकेमध्ये आयुक्त शीतल तेली उगले आणि उपायुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली सिटी टास्क फोर्सची बैठक संपन्न झाली, त्यामध्ये हा निर्णय घेण्यात आला.**

सोलापूर महानगरपालिकेच्या १५ नागरी आरोग्य केंद्रातर्फे आरोग्य अधिकारी डॉ. बसवराज लोहारे यांच्या मार्गदर्शनाखाली ९महिने ते ५ वर्षे पर्यंतच्या बालकांसाठी १५ डिसेंबरपासून वरील विशेष मोहीम संपूर्ण



शहरांमध्ये राबविण्यात येणार आहे. ९ ते १२ महिने या वयोगटांमध्ये तसेच दुसरी मात्रा १६ ते २४ महिने या वयोगटात दिली जाते. परंतु काही कारणास्तव यापैकी एखादी जरी मात्रा राहिली असेल तरीसुद्धा पालकांनी नजीकच्या नगरी आरोग्य केंद्रामध्ये संपर्क साधून आपल्या बालकाचे लसीकरण पूर्ण करून घ्यावे. तसेच त्याबरोबर जीवनसत्व 'अ'ची मात्राही घ्यावे, असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

**लसीकरण मोहिमेस प्रतिसाद द्यावा : आयुक्त**

गोवरच्या आजारामुळे गुंतागुंतीचे आजार होऊ शकतात. पालकांनी जागरूकता दाखवत लसीकरण मोहिमेत आपल्या बालकांना लस द्यावी आणि आरोग्य खात्यात सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्त शितल तेली-उगले त्यांनी केलेले आहे.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE**

Digitally signed online bids are invited through E-Tender process of MSETCL in two-bid system from bidders who are registered Contractors of MSETCL. **RFx No. 7000025398; E-Tender No.** EE/400kV/R.S/DN/LBT/-Tender: 08/2022-2023, **Particulars:** Work of providing and fixing of 220 kV IV Bushing suitable for 1x167 MVA, 400/220kV ICT unit and 52 kV Tertiary bushing suitable for 167 MVA 400/220 kV ICT unit at 400 kV R.S. Division Lamboti. **Estimated Cost:** Rs. 12,00,976/- **EMD (Approx. 1% of Est. Cost):** Rs 12,009/- **Tender Cost in Rs.** 500/- + 5% GST i.e. Rs. 525/-, **Sale Period:** 14.12.2022 to 22.12.2022, **Last Date of Submission:** 22.12.2022 up to 23:59 Hrs, **Date of opening (Tech. Bid):** 23.12.2022 at 12:00 Hrs (If possible). **Contact Person:** Executive Engineer -7447441034. For further details, please visit **https://srmetender.mahatransco.in**

**Note:** All eligible Suppliers/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**400 kV R.S. Div Lamboti**

# कर्नाटकात ऊस उत्पादकांना ‘इथेनॉल’ विक्रीचाही मिळणार लाभ

सुराज्य/शिवाजी हळणवर

**कर्नाटकमधील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या आता इथेनॉल विक्रीचाही लाभ मिळणार आहे. हा देशातील पहिलाच प्रयोग आहे. प्रतिटन ऊसामागे एफआरपी शिवाय अतिरिक्त ५० रुपये देण्यात येणार असल्याची माहिती कर्नाटकचे मंत्री शंकर पाटील मुनेनकोप्पा यांनी दिली आहे.**

महाराष्ट्रातील खासगी आणि सहकारी अशा दोन्ही क्षेत्रातील साखर कारखान्यांची केवळ इथेनॉल निर्मिती मधूनच यंदा अंदाजे १२ हजार कोटी रुपये कारखान्यांकडे येण्याची शक्यता आहे. राज्य हळूहळू ’ब्राझिल पॅटर्न’कडे वाटचाल करीत आहे. मग कर्नाटकातील शेतकऱ्यांना इथेनॉलचे अतिरिक्त ५० रूपये मिळत असतील तर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना ही मिळायला हवेत अशी मागणी ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी केली आहे.


## ‘या’ निर्णयाचा महाराष्ट्रतही परिणाम होण्याची शक्यता



ऊसाला वाढीव दर द्यावा, या मागणीसाठी कर्नाटकात शेतकरी संघटना आंदोलन करत आहेत. अशा वेळी सरकारनं इथनॉलचा लाभही शेतकऱ्यांना देण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय जरी कर्नाटक राज्यात झाला असला तरी महाराष्ट्र हे सुद्धा ऊसाचं विक्रमी उत्पादन करणारं महत्वाचं राज्य आहे. साखर कारखान्यांना उपपदार्थ निर्मितीतून मोठे उत्पन्न मिळते. यामध्ये मोलॅसिस, विजनिर्मिती, उछ्क्र सारखे प्रकल्प असतील किंवा इथेनॉल असेल यातून कारखान्यांना चांगले उत्पन्न मिळते. महाराष्ट्रात देखील गेल्या आठ वर्षात साखर कारखान्यांनी इथेनॉल निर्मितीत मोठी वाढ केली आहे. त्यामुळं कर्नाटक सरकारच्या निर्णयानंतर महाराष्ट्रातील ऊस उत्पादक शेतकरी ही आक्रमक झाले असून शेजारीचे राज्य उपपदार्थातील वाटा देत असेल तर सर्वात जास्त ऊस उत्पादन करणाऱ्या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना तो वाटा मिळाला पाहिजे अशी मागणी होत आहे.

## शेतकऱ्यांना एफआरपीपेक्षा अधिक दर दिला पाहिजे

अशा प्रकारची मागणी शेतकरी नेते दिवंगत शरद जोशी यांनी केली होती. आता आपल्या शेजारच्या कर्नाटक राज्यात असा निर्णय झाल्यामुळं महाराष्ट्रातील ऊस उत्पादकांनीही तशी मागणी केली आहे. यापासून शेतकऱ्यांना मोठा लाभ होईल अशी अपेक्षा आहे.



## शहाजी प्रशालेच्यावतीने अमोलराजे भोसले यांचा सत्कार

**अक्कलकोट** : श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांना विक्रमशीला हिंन्दी विद्यापीठ-भागलपूर, बिहार सारस्वत सन्मान वर्ष-२०२२ चा सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल महाराष्ट्र भूषण’ या पुरस्कार मिळाल्याबद्दल मराठा मंदिर मुंबई संचलित श्री शहाजी प्रशालेच्यावतीने सत्कार करण्यात आला. नुकतेच पुणे येथील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वाणिज्य विभाग सभागृहात केंद्रीय शाखा महाराष्ट्र राज्य आयोजित विशेष सारस्वत सन्मान वर्ष-२०२२ चा महाराष्ट्र भूषण’ या पुरस्कार प्रदान सोहळा संपन्न झाला होता. अमोलराजे भोसले यांचा श्री शहाजी प्रशालेच्यावतीने सत्कार संपन्न झाला. या कार्यक्रमास मुख्याध्यापक एस.आर.कांबळे, उपमुख्याध्याक एस.व्ही.भागरे, आर.एस.पडवळकर, एम.बी.मुनोळी, ए.एस.कोरे, बी.एस.सुतार, अरविंद शिंदे व न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, विश्वस्त लक्ष्मण पाटील, निखिल पाटील, सिध्दाराम कल्याणी, एस.के.स्वामी, संजय कुलकर्णी, सतिश महिंद्रकर, शहाजी यादव, महांतेश स्वामी, समर्थ घाटगे, कल्याण देशमुख, संभाजीराव पवार आदीजण उपस्थित होते.



## सहकार महर्षी मोहिते पाटील विद्यालयाचे रायफल शूटिंग स्पर्धेत यश

**वेळापूर** : वेळापूर तालुका माळशिरस येथील सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील विद्यालय वेळापूर च्या विद्यार्थ्यांनी रायफल शूटिंग स्पर्धेत घवघवीत यश मिळवले आहे. पिलीव येथे पार पडलेल्या जिल्हास्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेत १४ वर्षे वयोगटात मुली कु. स्नेहा हनुमंत साठी द्वितीय क्रमांक व १७ वर्ष वयोगटात मुली कु. सिध्दी राजेंद्र राऊत तृतीय क्रमांक मिळवून दोघींचे पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या सर्व विद्यार्थांना क्रिडाशिक्षक रामचंद्र लोंढे यांचे मार्गदर्शन लाभले. या सर्वांचे शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज संस्थेचे जेष्ठ संचालक जयसिंह शंकराव मोहिते-पाटील, शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह जयसिंह मोहिते पाटील, संचालिका कु. स्वरूपाराणी जयसिंह मोहिते पाटील, संस्थेचे सचिव अभिजीत रणवरे, सहसचिव खराडे, विद्यालयाचे सभापती सतीशराव माने देशमुख, विद्यालयाचे प्राचार्य अमोल फुले, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांना स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.



## कर्जाळ येथे माता-पालक गट बैठक

**कर्जाळ** : आम्ही सावित्रीच्या लेकी या मातापालक गटाने कर्जाळ येथे तेरावा आठवड्याची बैठक मातापालक सुनिता पाटील यांच्या पार पडली. लिडर मातापालक अर्चना नवगिरे यांनी सर्व मातांकडून मागील आठवड्याचे वर्कशीट घेतले. काहीतरी नवीन शिकूया याचे मोबाईलवर प्रात्यक्षिक मातापालक भारती दुलंगे यांनी सर्व मातांना दाखवले. शिक्षिका सुवर्णा बोरगांवकर यांनी मातापालक यांच्याशी चर्चा करीत मार्गदर्शन केले. यावेळी जयश्री आळगी भारती दुलंगे, प्रभावती मुगळी, हरणाबाई होटकर, सुगलाबाई सराटे, सुनिता पाटील आदी उपस्थित होते.

## कमी किंमतीत सोने देण्याची थाप मारून साडेचार लाखांची लूट

**सोलापूर** : मंगळवेढा-कमी किमतीत सोने देतो अशी थाप मारून दोघांना लाथाबुक्क्याने मारहाण करून ४ लाख ४८ हजाराची रोकड लुटून नेल्याची घटना बोराळे (ता. मंगळवेढा) येथे मंगळवारी सकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणात मंगळवेढ्याच्या पोलिसांनी सुरेश उर्फ बिगुल्या काळे (वय ३२ रा.सिध्दापूर ता. मंगळवेढा) याच्यासह चौघा विरुध्द दरोड्याचा गुन्हा दाखल केला आहे. या संदर्भात शेट्टीबा गौतम जाधव (वय ३२ रा.किल्लारी जि.लातूर)यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली.जाधव यांचा द्राक्ष छाटणीचा व्यवसाय असून त्या कामासाठी ते मंगळवेढा परिसरात राहण्यास होते. दरम्यान त्यांची ओळख बिगुल्या काळे याच्यासोबत झाली होती. त्याने कमी किमतीत सोने देतो म्हणून त्यांना बोराळे येथील कॅनलपट्टी जवळ बोलावले होते. त्या ठिकाणी गेल्यानंतर काळे आणि अन्य तिघांनी त्यांना बेदम मारहाण केली. त्यानंतर त्यांच्या खिशातील रोकड आणि मोबाईल लुटून पसार झाले. अशी नोंद पोलिसात झाली. पुढील तपास सहाय्यक निरीक्षक वाघमोडे करीत आहेत.

## अकलूजच्या डॉ.आंबेडकर शासकीय वसतिगृहासाठी लवकरच जिल्हाधिकाऱ्यांसोबत बैठक : सोनवणे

सुराज्य/अकलूज



अकलूज ता.माळशिरस येथिल डॉ.बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृहासाठी जागा उपलब्द करण्यासाठी जलदगतीने कार्यवही सुरु केली असून,या सदर्भात तांत्रिक अडचणी दुर करण्यासाठी लवकरच जिल्हाधिकाऱ्यांन सोबत बैठक लावण्यात येईल आशी माहीती समाज कल्याण विभाग शासकीय निवाशी शाळा विशेष अधिकारी सुलोचणा सोनवणे यांनी दिली.

अकलूज येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर शासकीय वस्तीगृहाची इमारत उभारण्यात यावी यासाठी प्रांताधिकारी कार्यालयासमोर ड. अविनाश काले,गौतम भंडारे व नागेश लोंढे यांनी १२ डिसेंबर पासून प्राणांतिक उपोषण सुरु केले होते. उपोषणकर्त्यानी वस्तीगृहा संदर्भात केलेल्या मागण्यावर जलद गतीने कार्यवही सुरु करण्याचे लेखी उत्तर सोलापूर समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त कैलास आडे यांनी दिल्यानंतर हे आंदोलन स्थगित केले होते.या आंदोलनाची दखल घेवुन समाज कल्याण विभाग शासकीय निवाशी शाळा विशेष अधिकारी सुलोचणा सोनवणे यांनी आज अकलूज येथिल वस्तीगृहास भेट दिली व आंदोलनकर्त्यांची भेट घेवुन समश्या ऐकुण घेतल्या.व त्यावर जलद गतीने कार्यवाही होईल असे सांगितले.

शिवाय सद्या वस्तीगृह सुरु आसलेल्या इमारतीची दुरुस्ती व विद्यार्थ्यांच्या गैरसोयी त्वरीत दुर करण्याच्या सुचना देवुन हे काम जलदगतीने सुरु केले. यावेळी पत्रकारांशी बोलताना विशेष अधिकारी सुलोचणा सोनवणे म्हणाल्या वस्तीगृहास जमीण मिळण्यासाठी जलद गतीने कार्यवाही सुरु केली असून या संदर्भात लवकरच सोलापूरचे जिल्हाधिकारी मिलींद शंभरकर यांच्या सोबत संबधित प्रशासकीय अधिकारी व आंदोलनार्ते यांची बैठक आयोजित करुन या संदर्भातील तांत्रिक अडचणी दुर करुन वस्तीगृहाची इमारत उभी करण्याच्या कामाला गती दिली जाईल.

## कर्नाटकात जाण्यास परवानगी मागण्याच्या निवेदनाबद्दल नोटीस

सुराज्य/अक्कलकोट

अक्कलकोट तालुक्यातील तडवळ भागातील अकरा गावांना पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सचिन खुडे यांनी कर्नाटकात जाण्यास परवानगी मागण्याच्या निवेदनाबद्दल प्रशासानाने नोटीस दिली होती. त्यातील १० ग्रामपंचायतीने आम्ही जाणार नाही याबाबत प्रशासनाकडे लेखी दिलेले असुन एका ग्रामपंचायतीचा खुलासा अजुन प्राप्त झाला नसल्याची माहिती अक्कलकोट पंचायत समिती गटविकास आधिकारी सचिन खुडे यांनी दिली.

अक्कलकोट तालुक्यातील तडवळ भागातील ११ गावांनी मुलभुत सुविधा मिळत नाहीत व आरोग्य, पाणी, रस्ते या विकासकामे झाली नाहीत या विविध कारणास्तव सुविधा तरी द्या, सुविधा देण होत नसेल तर कर्नाटकात जाण्यासाठी परवानगी तरी द्या या संदर्भात ग्रामपंचायतीने ठराव करून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले होते. याविषय संबंधाने अक्कलकोट तालुक्यातील धारसंग, आंदेवाडी खुर्द, शावळ, हिळ्ळी, मंगळूर , देवी कवठे, केगाव बुद्रुक, आळगे, कलकर्जाळ , कोर्सेगाव , शेगाव या ११ ग्रामपंचायतचे सरपंच, उपसरपंच यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदने, ठराव दिले होते. १० ग्रामपंचायतीने आम्ही जाणार नाही याबाबत आता प्रशासनाकडे लेखी दिलेले आहे . केवळ एक ग्रामपंचायतीकडून माघार घेतल्या बाबत अजुन पत्र उपलब्ध झालेले नाही असे प्रशासनाने सांगितले.



## पंढरपूर पोलिसांकडून चारचाकी वाहन चोरणाऱ्या टोळीचा पर्दाफाश; ८ वाहने जप्त

सुराज्य/पंढरपूर

पंढरपूर पोलिसांनी चार चाकी वाहने चोरणाऱ्या टोळीचा पडदा फाश केला आहे. धनाजी अटकळे आणि संतोष भोसले या चार चाकी गाडी चोरीत पटाईत असलेल्या दोन चोरांना पकडण्यात पोलिसांना यश आले आहे.

चोरीचे वाहन विकत घेणाऱ्या संतोष आर्किलेला देखील अटक करण्यात आली आहे. यांच्याकडून ३ बुलेरो आणि ३ पीक अप १ बुलेट, १ दुचाकी अशी ८ वाहने जप्त केल्याची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांनी दिली आहे.

रांजणी ता पंढरपुर येथे एका वस्तीवर गाडी खराब झाली आहे, उद्या गाडी घेऊन जातो असे धनाजी अटकळे याने वस्तीवरील रहिवाशांना सांगून गाडी लावून गेला होता. याबाबत माहिती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रमुख चिमणाजी केंद्रे यांना मिळाल्यानंतर त्यांनी त्या ठिकाणी पथक पाठवले. गाडी घेण्यात येणाऱ्या चोर धनाजी अटकळेला संशय येऊ नये म्हणून पोलिसांनी शेतकऱ्यांच्या वेशात शेतामध्ये काम करत असल्याचा बनाव रचला. एक रात्र आणि एक दिवस झाल्यानंतर दबा धरून बसलेल्या पोलिसांना दुसऱ्या दिवशी गाडी लावणारा चोर धनाजी आटकळे हाती लागला. त्यानंतर त्याच्या साथीदाराला संतोष भोसले ला पोलिसांनी ताब्यात घेतले या दोघांकडून एकूण आठ वाहने ताब्यात घेतल्याची माहिती पोलीस निरीक्षक अरुण फुगे यांनी दिली

ही कामगिरी उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम पंढरपूर, शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अरुण फुगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक चिमणाजी केंद्रे, दत्तात्रेय आसबे, राजेश गोसावी, शरद कदम, सुरज हेंबाडे, बिपीन ढेरे, सचिन इंगळे, सचिन हेंबाडे, सुनील बनसोडे, दादा माने, राकेश लोहार, सुजित जाधव, समाधान माने, शहाजी मांडले, गणेश शिंदे, सायबर सेलचे अनवर अत्तार यांनी केली आहे.

## माढा येथे विठ्ठल प्रतिष्ठानच्या डी व बी फार्मसी कॉलेजला मंजुरी : शिंदे

### शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू

**माढा** : माढा तालुक्यातील विठ्ठल प्रतिष्ठान निमगाव (टें) या संस्थेचे माढा शहरात डी व बी फार्मसी कॉलेज सुरू करण्यास महाराष्ट्र शासनाच्या तंत्रशिक्षण संचालनालयाची मंजुरी मिळाली असून शैक्षणिक वर्ष २०२२ २३ करिता प्रवेश प्रक्रिया सुरू झाल्याची माहिती जिल्हा दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह शिंदे यांनी दिली आहे.



माढा शहरात नव्याने सुरू होणा-या डी फार्मसी कॉलेजमध्ये ६० जागा व बी फार्मसी कॉलेजमध्ये ६० जागांसाठी प्रवेश दिला जाणार आहे.मागील अनेक वर्षापासून माढा तालुक्यात व्यावसायिक शिक्षण सुरू करण्याची मागणी शिक्षणप्रेमी नागरिकांमधून सातत्याने होत होती यानिमित्ताने त्याची पूर्तता होत आहे.माढा शहर व ग्रामीण भागातील गरजू व होतकरू विद्यार्थ्यांची व्यावसायिक व तंत्रशिक्षणाची गरज तालुक्यातच पूर्ण होण्याच्या उद्देशाने हे नवीन कॉलेज सुरू केले आहे. या कॉलेजचा PCI CODE-४६०१ आहे तर DTE CODE- ६९८१ असून CHOICE CODE -D.PHRM² साठी - ६९८१८२३१० आणि B.PHRM² करिता - ६९८१८२३१० असून कॅप राऊंडमध्ये विद्यार्थ्यांनी प्रवेशाची नोंद करावी असे आवाहन त्यांनी केले आहे.


## दुचाकी पळवली

**सोलापूर** : कोणीतरी अज्ञात चोरट्याने दत्त चौक जवळील दत्त मंदिरच्या पाठीमागील शुभ्राम टॉवर येथून दूचाकी क्रमांक एम.एच.१३. सीवी.६५१७ हि चोरून नेले आहे.ही घटना दि.६ डिसेंबर रोजी घडली या प्रकरणी अंबादास नारायण म्याडम (वय-४६,रा. आय ग्रुप हैदराबाद रोड,जुना विडी घरकुल, सोलापूर) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली.

## इलेक्ट्रिक मोटर चोरी प्रकरणातील दोघांना एक दिवसाची पोलीस कोठडी

### वेळापूर पोलिसांनी केल्या ५ इलेक्ट्रिक मोटारी जप्त


**वेळापूर** : तांदुळवाडी (ता. माळशिरस) येथे खबऱ्यांकडून मिळालेल्या माहितीनुसार धाड टाकून दोघां चोरट्यांना ताब्यात घेण्यात आले. तांदुळवाडी येथील गेले अनेक दिवसापासून इलेक्ट्रिक मोटारींची चोरी होत होत्या. परंतु आरोपी सापडत नव्हता. वेळापूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी निलेश बागाव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनीरीक्षक संजय राऊत, पोलीस हवालदार उमाजी चव्हाण, पोलीस नाईक अमोल वाघमोडे यांनी संशयित आरोपीच्या परिसरात पाहणी केली असता पोलिसांना दोन इलेक्ट्रिक मोटारी मिळून आल्या. या गुन्ह्याबाबत वेळापूर पोलिसांनी तांदुळवाडी येथील हरि अण्णा उर्फ अण्णा सुभाष चव्हाण वय ३५ व किशोर उर्फ शेवा केशव मिले या दोघांना ५ एचपी इलेक्ट्रिक मोटर किंमत ६ हजार रुपये व लक्ष्मी कंपनीची ५ एचपी पाणबुडी मोटर किंमत ५ हजार अहमदाबाद मॉडेल यासह ५ इलेक्ट्रिक मोटार सह ताब्यात घेतले आहे. याबाबत वेळापूर पोलीस स्टेशनला पांडुरंग निवृत्ती मिले यांनी दिलेल्या फिर्याद नुसार या गुन्ह्याची नोंद होऊन वरील दोन्ही आरोपींना पोलिसांनी अटक करून माळशिरस न्यायालयासमोर उभे केले असता दोन्ही आरोपींना एक दिवसाची पोलीस कस्टडी सुनावली आहे. माळेवाडी अकलूज येथील पांडुरंग निवृत्ती मिले त्यांच्याकडे तांदुळवाडी येथे असणाऱ्या शेती मध्ये ५ एचपी लक्ष्मी मोटार होती व दुसरी पाणबुडी ५ एचपी इलेक्ट्रिक मोटर होती.



दिनांक ७ डिसेंबर रोजी ते स्वतः तांदुळवाडी येथील शेतामध्ये कामे करून मोटारीचा ऑटो स्विच बंद करून संध्याकाळी ५.३०च्या सुमारास माळेवाडी अकलूज येथे घरी आलो असता दिनांक ११ डिसेंबर रोजी सकाळी ११.३० च्या सुमारास तांदूळवाडी येथील रानातील इलेक्ट्रिक मोटर चालू करण्यासाठी विहिरीवर गेले असत. त्यावेळी मोटारीचा पाईप कट केलेला दिसला म्हणून त्यांनी पाईप ओढून पाहिला असता पाईपला पाणबुडी मोटर नव्हती त्यांनी इलेक्ट्रिक मोटरचा आजूबाजूला शोध घेतला बांधाऱ्याकडे चौकशी केली परंतु त्यांची मोटर मिळून आली नाही. अशा तक्रारी दाखल आहेत.

## विकासाचे अनुशेष भरून काढल्याशिवाय स्वस्थ्य भसणार नाही : आ.कल्याणशेट्टी

**अक्कलकोट** : अक्कलकोट तालुक्यात विकास कामाच्या माध्यमातून पुढील काळात विकासाचं अनुशेष भरून काढल्याशिवाय स्वस्थ्य भसणार नाही गावच्या प्रमुखांनी पाठपुराव्याला कमी पडू नका मी विकास कामाला निधी कमी पडू देणार नाही अशी ग्वाही आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी दिली.



अक्कलकोट तालुक्यातील सुलेर जवळगे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या निधीतून मंजूर झालेल्या विविध विकास कामांचा भूमिपूजन समारंभ संपन्न झाला.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माजी आमदार सिद्रामप्पा पाटील हे होते. याप्रसंगी गुरुलिंगय्या माहा स्वामी, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष शिवानंद पाटील, सुमित पाटील, शिवा संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजकुमार सारणे, बांधकाम विभागाचे उपअभियंता आर.सी भोसले, शाखा अभियंता आर.ए.खांडेकर, सरपंच दिपाली देवकते, उपसरपंच धर्मनाथ घोडके, सोसायटी चेअरमन रविकांत बगले, ग्रा.पं. सदस्य नागनाथ पाटील देविदास कोळेकर, बाबुशा जगताप, रविकांत कापसे, धोंडवा पुजारी, मेहरुनीसा बोलसुरे, लक्ष्मण वाघमारे, सुरेखा चौधरी आदींची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

दरम्यान आमदार निधीतून मंजूर झालेल्या श्री कलमेश्वर मंदिर सभामंडप पिरवली दर्गा सभामंडप आणि सिमेंट काँक्रिटीकरण रस्ता भूमिपूजन आधी कामाचा शुभारंभ आमदार सचिन कल्याण शेट्टी यांच्या हस्ते करण्यात आला. दरम्यान सत्कारानंतर प्रमुख मान्यवरांच्या ग्रामपंचायतीच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला. याप्रसंगी बोलताना आ.सचिन कल्याणशेट्टी यांनी तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी आपण कटिबद्ध असून पुढील काळात विकास निधीच्या माध्यमातून तालुक्याच्या अनुशेष भरून काढणार असल्याची ग्वाही देताना रस्ते नदीला पाणी यावर माझा जास्तीत जास्त भर राहणार असल्याची ग्वाही त्यांनी याप्रसंगी बोलताना दिली.

माजी आमदार सिद्रामप्पा पाटील यांनीही सचिन कल्याणशेट्टी यांच्या माध्यमातून तालुक्यामध्ये विकास कामे सुरू आहेत. तडवळ भागाच्या रस्त्याच्या संदर्भात आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी जास्तीचा निधी यासाठी द्यावी अशी मागणी माजी आमदार सिद्रामप्पा पाटील यांनी याप्रसंगी बोलताना केले. प्रसंगी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष शिवानंद पाटील यांनी जिल्हा परिषदेच्या माध्यमातून सुलेर जवळगे गावासाठी आपण भरघोस निधी दिला आहे. त्यापुढील काळाची गावकऱ्यांची साथ पाटील परिवारांच्या पाठीशी खंबीरपणे राहावं असं ते म्हणाले. प्रास्ताविकात अंबादास देवकते यांनी केले.

सुराज्य सोलापूर
Classified
वधु-वर विषयक
● वधु - २६, ५.३, गोरी, १२ वी हिंदू मराठा, वडील नाहीत, आई मुलीचे पुजा सामग्रीचे दुकान, शेती ४ एकर, मुलीकरीता सर्वजातीय वर चालेल.
संपर्क : 8378879265
7028536999
(191222)

# महागाई उतरल्याने दिलासा; भाज्या-खाद्यपदार्थ झाले स्वस्त

सुराज्य/मुंबई

नोव्हेंबरमध्ये घाऊक महागाई दरात मोठी घसरण झाली होती. बुधवारी जाहीर झालेल्या सरकारी आकडेवारीनुसार, घाऊक किंमत आधारित महागाई (थइखख) ५.८५ टक्क्यांपर्यंत खाली आली आहे असून तो २१ महिन्यांचा नीचांक आहे. यापूर्वी फेब्रुवारी २०२१ मध्ये महागाई दर ४.८३ टक्के इतका कमी होता.

उत्पादित उत्पादने, इंधन आणि खाद्यपदार्थांच्या किंमती कमी झाल्याने नोव्हेंबरमध्ये घाऊक महागाई ५.८५ टक्के राहिली आहे. ऑक्टोबरमध्ये महागाई ८.३९ टक्के, सप्टेंबरमध्ये १०.७० टक्के, ऑगस्टमध्ये १२.४१ टक्के आणि जुलैमध्ये १३.९३ टक्के होती. गेल्या वर्षी नोव्हेंबर २०२१ मध्ये महागाईचा आकडा १४.८७ टक्के होता.



## अन्नधान्य महागाई घटली

नोव्हेंबरमध्ये घाऊक महागाईमधील घसरणीचे मुख्य कारण म्हणजे अन्नधान्याच्या भावातील घट. या महिन्यात अन्नधान्य महागाई २२ महिन्यांच्या नीचांकावर म्हणजे २.१७ टक्क्यांवर आली आहे. ऑक्टोबर २०२२ मध्ये अन्न महागाई दर ६.४८ टक्के होता. दुसरीकडे, अन्न निर्देशांक १.८ टक्क्यांपर्यंत खाली आला आहे. मॅन्युफॅक्चरिंग उत्पादनांची महागाईही ४.४२ टक्क्यांवरून ३.५९ टक्क्यांवर आली आहे. इंधन आणि उर्जा महागाई देखील ऑक्टोबरमधील २३.१७ टक्क्यांवरून नोव्हेंबरमध्ये १७.३५ टक्क्यांवर आली आहे.

## किरकोळ महागाई नीचांकावर

नोव्हेंबर महिन्यात किरकोळ महागाई (CPI) ५.८८ टक्क्यांवर आली आहे. ही ११ महिन्यांतील नीचांकी पातळी आहे. डिसेंबर २०२१ मध्ये महागाई ५.५९ टक्के होती. तेंव्हापासून महागाई सतत ६ टक्क्यांच्या वर होती. ऑक्टोबर २०२२ मध्ये किरकोळ महागाई ६.७७ टक्के होती तर सप्टेंबरमध्ये हा दर ७.४१ टक्के होता.

# मंत्रिमंडळ विस्ताराची चर्चा मंदावली

## हिवाळी अधिवेशनात २१ विधेयके मांडली जाणार

सुराज्य/नागपूर

**विधिमंडळाच्या नागपूर हिवाळी अधिवेशनाचे बिगुल वाजले असून मंगळवारी मुंबईत झालेल्या कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत दोन आठवड्याचा (१० दिवस) कार्यकाळही निश्चित करण्यात आला आहे. अधिवेशनात २१ विधेयके मांडली जाणार असून त्यावर चर्चा अपेक्षित आहे. दरम्यान, विधिमंडळ इमारत परिसरात सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आली आहे.**



विधिमंडळ सचिवालयाने अधिवेशनाच्या कामकाजासंदर्भात काढलेल्या तात्पुरत्या दिनदर्शिकेनुसार पहिल्या दिवशी (१९ डिसें.) दोन्ही सभागृहात अध्यादेश पटलावर ठेवणे, पुरवणी मागण्या सादर करणे, मंगळवार, बुधवारी शासकीय कामकाज, गुरुवारी पुरवणी मागण्यांवर चर्चा, शुक्रवारी पुरवणी मागण्यांवर चर्चा व मतदान आणि पुरवणी नियोजन विधेयक अशा स्वरुपाच्या कामकाजाचे नियोजन करण्यात आले आहे. मात्र, सीमावाद, थोर पुरुषांबाबत सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांनी केलेली आक्षेपार्ह वक्तव्ये पाहता पहिले दोन दिवस या मुद्यांवर दोन्ही सभागृहात वादंग होण्याची शक्यता आहे.

विधानभवनात सोमवारपासून वर्दळ वाढली आहे. प्रवेशद्वारावर सुरक्षा सैनिक तैनात करण्यात आले असून ओळखपत्र तपासूनच आत सोडले जात आहे. विधानभवनाकडे जाणाऱ्या मार्गावर सुरक्षा कठडे लावण्यात आले आहे. रविवारी सर्व मंत्री नागपुरात दाखल होतील.

हिवाळी अधिवेशनापूर्वी मंत्रिमंडळाचा विस्तार केला जाईल, अशी घोषणा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूरमध्ये दिवाळीत केली होती. त्यानंतर इच्छुकांच्या नावांबाबत चर्चाही सुरू झाली. आता हिवाळी अधिवेशन तोंडावर आले तरी यावर कोणाही चर्चा करीत नाही. सध्या हा विषय मागे पडल्याचेच चित्र आहे.


**नामफलकांची रंगरंगोटी**

अधिवेशनानिमित्त सचिवालयात सुरू होणाऱ्या शासनाच्या विविध विभागाच्या नावांच्या पाट्याची रंगरंगोटी केली जात आहे. मंत्र्यांच्या बंगल्याबाहेर मंडप टाकण्यात येत असून रस्ते दुरुस्तीचे काम अंतिम टप्प्यात आहे.

# समृद्धी महामार्गावर गोळीबाराची घटना

सुराज्य/नागपूर

**देशाचे पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते उद्घाटन झालेल्या समृद्धी महामार्गावर सातत्याने अपघाताच्या घटना घडत असताना आता गोळीबाराची घटना समोर आली आहे. औरंगाबाद जिल्ह्यातील सावंगी भागातील बोगद्याजवळ एका तरुणाने हवेत गोळीबार करताना दिसत आहे. याचा एक फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.**



महाराष्ट्राची भाग्य रेषा म्हणून समृद्धी महामार्गाचे रविवारी उद्‌घाटन करण्यात आले, मात्र, प्रवासापेक्षा हा महामार्ग अपघातांमुळे चर्चेत येत आहे. महामार्ग सुरु झाल्यापासून यावर रोज अपघाताच्या घटना घडत आहेत. यानंतर आता महामार्गावर एक तरुणाने गोळीबार केल्याची घटना समोर आली आहे. सोशल मीडियावर व्हायरल होणाऱ्या व्हिडिओमध्ये एक तरुण हातात बंदूक घेत पाठमोरा उभा दिसतोय.

व्हिडिओत एक तरुण हातात बंदूक घेऊन उभा असून त्यांच्यामागे एक बोगदा दिसतोय. महामार्गावरील या बोगद्याजवळ एका स्कॉर्पिओ गाडीसमोर उभा राहून याने हवेत गोळीबार केला असे या फोटोतून दाखवण्यात आले आहे. मात्र, हा फोटो कुणी सोशल मीडियावर टाकला तो खरा आहे की खोटा याबाबत पोलीस तपासणी करत आहेत.

# राज्यात थंडी परतणार

सुराज्य/पुणे

राज्यावर गेल्या तीन ते चार दिवसांपासून असलेले पावसाचे सावट आता पूर्णपणे कमी झाले आहे. पुढील दोन दिवसांत थंडी हळूहळू वाढणार आहे.

सध्या राज्यातील सर्वच भागातील किमान तापमान चढेच (सरासरीपेक्षा जास्त) असल्याचे दिसून येत असल्याचे हवामान विभागाने सांगितले. दरम्यान, मंगळवारी राज्यात सर्वात कमी तापमानाची नोंद गोंदिया येथे १५.२ अंश सेल्सिअस करण्यात आली. उत्तर भारतातील पंजाब राज्यात १७ आणि १८ डिसेंबर रोजी शीतलहर येण्याची शक्यता आहे. त्यामुळे राज्यात थंडी पुन्हा वाढण्याची शक्यता आहे.बंगालच्या उपसागरात तयार झालेले चक्रीवादळ आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीवरून भूपृष्ठभागाकडे आले आहे. त्यानंतर त्याची तीव्रता कमी होऊन ते पूर्णपणे शमले आहे.

# पुरस्कार रद्द केल्याच्या निषेधार्थ भाषा सल्लागार समितीच्या अध्यक्षपदाचा देशमुख यांचा राजीनामा

सुराज्य/पुणे

**राज्य सरकारने कोबाड गांधी यांच्या मराठी अनुवादाला दिलेला पुरस्कार रद्द केल्यानंतर साहित्य क्षेत्रातून सरकारच्या निषेधाचा पूर आला आहे. ज्येष्ठ लेखक डॉ. लक्ष्मीकांत देशमुख यांनी पुरस्कार रद्द प्रकाराचा निषेध करून भाषा सल्लागार समितीच्या अध्यक्षपदाचा राजीनामा देत असल्याचे जाहीर केले.**

मराठी भाषा विभागाने 'फ्रॅक्चर्ड फ्रीडम' या कोबाड गांधी यांच्या इंग्रजी पुस्तकाचा अनघा लेले यांनी केलेल्या मराठी अनुवादाला तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी यांच्या नावाचा पुरस्कार राज्य शासनाने जाहीर केल्यानंतर अवघ्या तीन दिवसात एक शासन निर्णय जारी करून रद्द केला.



नक्षलवादाचे उदात्तीकरण राज्यात होऊ शकत नाही, असे कारण आपण स्वतः त्यासाठी दिले आहे. मी हे पुस्तक वाचले आहे व त्यात आपण म्हणता तसे आक्षेपार्ह कांही नाही असे माझे एक लेखक म्हणून मत आहे. मूळ इंग्रजी पुस्तकात आणि मराठी अनुवादात आपण म्हणता तसे नक्षलवादाचे उदात्तीकरण आणि हिंसेचा पुरस्कार लेखकाने केलेला नाही. ज्या तज्ज्ञ परीक्षकाने सदर पुस्तकाची पुरस्कारासाठी निवड केली त्यांचे आणि मराठी अनुवादिका श्रीमती अनघा लेले यांचे शासनाकडे पुस्तक संदर्भात प्राप्त झालेल्या आक्षेपाबाबत मत घेऊन त्यावर विचार करून पुरस्कार रद्द करण्याचा निर्णय घेतला असते, तर एक वेळ तेही समजून घेता आले असते, पण अशी चौकशी प्रक्रिया मराठी भाषा विभागाने अंगिकारल्याचे दिसून येत नाही. म्हणून जाहीर झालेला पुरस्कार रद्द करणे अत्यंत अनुचित आहे असे मी स्पष्टपणे अधोरेखित करीत आहे.

# वारकरी आक्रमक; अंधारेंची प्रतिकात्मक अंत्ययात्रा

सुराज्य/पुणे

**सुषमा अंधारे त्यांच्या भाषणामधील एका वक्तव्याबद्दल वारकरी सांप्रदायाचे भावना दुखावल्याची चर्चा आहे. त्यामुळे सुषमा अंधारेंवर वारकरी संप्रदाय आक्रमक झाला आहे. आळंदी येथील वारकऱ्यांनी सुषमा अंधारेंची प्रतिकात्मक अंत्ययात्रा काढत त्यांना चपलेचा हार घालत निषेध केला.**

आळंदीचे युवा कीर्तनकार महेश मडके पाटील यांच्या नेतृत्वात हे आंदोलन करण्यात आले. सुषमा अंधारेंच्या प्रतिमेस चपलांचा हार घालत वारकऱ्यांकडून त्यांच्याच शैलीत उत्तर देण्यात आले. संतांबाबत बोलण्याआधी अभ्यास करा, असा सल्लाही वारकऱ्यांनी सुषमा अंधारेंना दिला आहे.

# शाईफेक प्रकरण नडले; पोलीस आयुक्त शिंदे यांची बदली

सुराज्य/पुणे

**पिंपरी - चिंचवडचे मावळते पोलीस आयुक्त अंकुश शिंदे यांना चंद्रकांत पाटील यांच्यावरील शाईफेक प्रकरण भोवले आहे. त्यांची बदली करण्यात आली असून त्यांच्या जागी विनयकुमार चौबे हे आता पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तपदाची सूत्रे हाती घेणार आहेत.**



मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यावर झालेल्या शाईफेक प्रकरणानंतर अंकुश शिंदे यांची बदली निश्चित होती असे बोलले जात होते. त्याला आज पूर्णविराम मिळालेला आहे. त्यांची बदली नाशिकच्या आयुक्तपदी करण्यात आली. याबाबतचे आदेश गृहविभागाने बुधवारी काढले आहेत. विनयकुमार चौबे हे अपर पोलीस महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई या ठिकाणी कार्यरत होते.

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला नेत्यावर जीवघेणा हल्ला

## नाशिकमधील धक्कादायक घटना

सुराज्य/नाशिक

**राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या आणि नाशिकमधील प्रसिद्ध नेत्ररोगतज्ज्ञ प्राची पवार यांच्यावर मंगळवारी रात्री जीवघेणा हल्ला झाला आहे.**



राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या आणि नाशिकमधील प्रसिद्ध नेत्ररोगतज्ज्ञ प्राची पवार यांच्यावर मंगळवारी रात्री जीवघेणा हल्ला झाला आहे. एका अज्ञात टोळक्याने त्यांच्यावर हल्ला केला आहे. या हल्ल्यात प्राची पवार गंभीर जखमी झाल्या असून त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. प्राची पवार ह्या राष्ट्रवादी काँग्रेसचे दिवंगत नेते वसंत पवार यांच्या कन्या आहेत.

नाशिक तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत गोवर्धन शिवारात हा प्रकार घडल्याची माहिती समोर आली आहे. घटनेच्या वेळी प्राची पवार गोवर्धन शिवारातील आपल्या फार्म हाऊसमध्ये गेल्या होत्या. दरम्यान, त्यांच्यावर जीवघेणा हल्ला झाला. याप्रकरणी गुन्हा दाखल झाला असून पोलीस आरोपींचा शोध घेत आहेत.

प्राची पवार यांच्यावरील हल्ल्यानंतर नाशिक शहरात एकच खळबळ उडाली आहे. त्यांच्यावर नेमका कोणत्या कारणातून हल्ला झाला, हे समजू शकले नाही. त्यांना तातडीने नाशिक येथील खासगी रुग्णालयात दाखल केले. त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली आहे.

# मित्रांकडून तरुणावर पिस्तुलातून गोळीबार

सुराज्य/पुणे

बोपदेव घाटात तरुणाच्या खून प्रकरणाचा उलगडा करण्यात गुन्हे शाखेला यश आले. मित्रांकडून चुकून पिस्तुलातून तरुणावर गोळी झाडण्यात आल्याने त्याचा मृत्यू झाल्याची माहिती प्राथमिक तपासात मिळाली आहे. या प्रकरणी तिघांना अटक करण्यात आली.

गणेश नाना मुळे (वय २१, रा. सातववाडी, हडपसर) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी पोलिसांनी योगेश सुभाष भिलारे (२४), रोहन राजेंद्र गायकवाड (वय २३), अक्षय संदीप गंगावणे (२१) यांना अटक करण्यात आली आहे. त्यांच्याबरोबर असलेल्या एका साथीदाराचा शोध घेण्यात येत आहे. गणेश मुळे आणि आरोपी मित्र आहेत. रविवारी गणेश घरातून बेपत्ता झाला होता. तपासात मिळालेल्या माहितीनुसार तिघा आरोपींना ताब्यात घेण्यात आले.

# अफगाण त्वरित सोडण्याची चिनी नागरिकांना सूचना

सुराज्य/नवी दिल्ली

**अफगाणिस्तानची राजधानी काबूलमधील चीनच्या मालकीच्या एका हॉटेलवर 'इस्लामिक स्टेट' या दहशतवादी संघटनेने केलेल्या हल्ल्यानंतर चीनने या देशातील आपल्या नागरिकांना अफगाणिस्तान लवकरात लवकर सोडण्याची सूचना केली आहे.**

अफगाणिस्तानच्या तालिबान शासकांसाठी चीनची ही भूमिका धक्कादायक ठरणार आहे. अफगाणिस्तानाची अर्थव्यवस्था उद्ध्वस्त होण्यापासून वाचवण्यासाठी तालिबान सरकारला विदेशी गुंतवणुकीची निकडीची गरज असताना चीनने हे पाऊल उचलले आहे. या हल्ल्यात तीन हल्लेखोरांसह पाच जण ठार झाल्याचे समजते. तालिबानचा प्रमुख प्रतिस्पर्धी 'इस्लामिक स्टेट' या संघटनेने सोमवारी काबूलच्या



लाँगन हॉटेलवर झालेल्या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली. या हल्ल्यात तीन हल्लेखोर व इमारतीच्या खिडकीतून उडी मारून पळून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या किमान दोन विदेशी नागरिकांचा मृत्यू झाला.चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते वांग वेनबिन यांनी या हल्ल्याचे वर्णन 'भीषण' असे केले.

या हल्ल्यामुळे चीनला मोठा धक्का बसला आहे. चीनने या घटनेची तपशीलवार चौकशी करण्याची मागणी करून चिनी नागरिक, संस्था, परियोजनांच्या सुरक्षेसाठी तालिबान सरकारला योग्य ती पावले उचलण्यास सांगितले आहे. काबूलमधील चिनी दूतावासाने या हल्ल्याची झळ पोहोचलेल्या नागरिकांच्या मदतीसाठी एक पथक पाठवल्याचे सांगितले.

# गेल्या आठ वर्षात जाहिरातींवर ६४०० कोटी खर्च

## मोदी सरकारने लोकसभेत दिली माहिती

सुराज्य/नवी दिल्ली

**सध्या मार्केटिंगचा जमाना असल्याने प्रत्येक कंपन्यांना जाहिरातींवर मोठा खर्च करावा लागतो. केंद्रातील मोदी सरकारने देखील गेल्या ८ वर्षांत जाहिरातबाजीवर कोट्यवधी रुपये खर्च केले आहेत. खुद्द माहिती आणि प्रसारणमंत्री अनुराग ठाकूर यांनी संसदेत ही माहिती दिली आहे.**

विविध वृत्तपत्रे तसेच दूरचित्रवाहिन्यांना दिलेल्या जाहिरातींच्या खर्चाचा तपशील माहिती आणि प्रसारणमंत्री अनुराग ठाकूर यांनी बुधवारी लोकसभेत दिला. त्यानुसार २०१४-१५पासून ७ डिसेंबर २०२२ या कालावधित मोदी सरकारने तब्बल ६४०० कोटी रुपये जाहिरातबाजीवर खर्च केल्याचे समोर आले आहे. त्यात प्रिंट मीडियातील जाहिरातींसाठी ३१३८.८१ कोटी रुपये तर, इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या जाहिरातींसाठी ३२६०.७९ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. तथापि, विदेशी माडियावर जाहिरात देण्यासाठी खर्च करण्यात आलेला नाही, असेही अनुराग ठाकूर यांनी स्पष्ट केले.

सरकारने उपलब्ध केलेल्या आकडेवारीनुसार सेंट्रल ब्युरो ऑफ कम्युनिकेशनच्या माध्यमातून २०१४-१५मध्ये प्रिंट मीडियातील जाहिरातींवर ४२४.८४ कोटी रुपये आणि इलेक्ट्रॉनिक मीडियावरील जाहिरातींवर ४७३.६७ कोटी रुपये खर्च करण्यात आले. २०१५-१६मध्ये प्रिंट मीडियावर ५०८.२२ कोटी रुपये आणि इलेक्ट्रॉनिक मीडियावर ५३१.६० कोटी रुपये, २०१६-१७ मध्ये प्रिंट मीडिया आणि इलेक्ट्रॉनिक मीडियातील जाहिरातींवर अनुक्रमे ४६८.५३ कोटी आणि ६०९.६० कोटी रुपये, २०१७ -१८मध्ये प्रिंट मीडियातील जाहिरातींवर ६३६.०९ कोटी रुपये आणि इलेक्ट्रॉनिक मीडियावर ५१४.२८ कोटी रुपये खर्च करण्यात आले.

त्याचप्रमाणे २०१८-१९मध्ये ४२९.५५ कोटी प्रिंट मीडियावरील जाहिरातींवर तर, ५१४.२८ कोटी रुपये इलेक्ट्रॉनिक मीडियावर खर्च करण्यात




आले आहेत. २०१९-२० या वर्षात २९५.०५ कोटी रुपये प्रिंट मीडियावर आणि ३१७.११ कोटी रुपये इलेक्ट्रॉनिक मीडियावरील जाहिरातींसाठी खर्च करण्यात आले. २०२०-२१मध्ये १९७.४९ कोटी रुपये प्रिंट मीडियावरील जाहिरातींवर व १६७.९८ कोटी रुपये इलेक्ट्रॉनिक मीडियावर तर, २०२१-२२ या वर्षांत १७९.०४ कोटी रुपये प्रिंट मीडिया आणि १०१.२४ कोटी रुपये इलेक्ट्रॉनिक मीडियावरील जाहिरातींसाठी केंद्र सरकारने खर्च केले.

२०२२-२३मध्ये ७ डिसेंबर २०२२पर्यंत प्रिंट मीडियावरील जाहिरातींसाठी ९१.९६ कोटी आणि इलेक्ट्रॉनिक मीडियावर ७६.८४ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत.

# राममंदिराचा प्रश्न सुटू शकतो, तर सीमाप्रश्न का नाही? : राऊत

सुराज्य/नवी दिल्ली

**संजय राऊत यांनी महाराष्ट्र-कर्नाटक सीमा वादावर भाष्य केले आहे. या वादात नरेंद्र मोदी, अमित शाहांनी मध्यस्थी करावी, अशी मागणी राऊतांनी केली.**



ते म्हणाले, 'या सीमा भागामध्ये कर्नाटकचे पोलीस धुडघुस घालत आहेत, तिथे राज्य पोलीस दलाचा फौजफाटा मागे करून सेंट्रल फोर्स पाठवावी हे केंद्रीय गृहमंत्री करू शकतात. हा संपूर्ण सीमा भाग मायनॉरिटी खाली येतो. मराठी लोक तिथे मायनॉरिटी खाली येतात. त्यामुळे मराठी भाषा, मराठी संस्कृती त्या संदर्भात अधिकार वाणीने आदेश देण्याचे काम हे गृहमंत्र्यांचा आहे. खरंच गृहमंत्री मध्यस्थीचा काम करणार असतील आणि जर यातून सकारात्मक निर्णय होणार असतील तर यावर टीका करण्याचा कारण नाही.

# रणजी क्रिकेटमध्ये अर्जुनची उत्कृष्ट कामगिरी

सुराज्य/नवी दिल्ली

मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरचा मुलगा अर्जुन तेंडुलकरने रणजी ट्रॉफीमध्ये पदार्पण करताच उत्कृष्ट कामगिरी केली आहे. त्याने शतक ठोकत इतिहास रचला आहे. गोव्याकडून खेळणाऱ्या अर्जुन तेंडुलकरने राजस्थानविरूद्धच्या पहिल्या डावात १७८ चेंडूत नाबाद शतकी खेळी केली. अर्जुन तेंडुलकरने आपल्या वडिलांप्रमाणे मुंबईमधून आपल्या क्रिकेट कारकिर्दिची सुरूवात केली आहे.



गोवा आणि राजस्थान संघात गोव्यामध्ये सुरू असलेल्या सामन्यात राजस्थानने प्रथम गोलंदाजी केली. त्यानंतर पहिल्याच दिवशी राजस्थानने गोव्याच्या संघाला धुळ चारली. परंतु सुयश प्रभुदेसाई आणि अर्जुन तेंडुलकर यांनी गोव्याचा डाव सावरला. प्रभुदेसाईने शतक ठोकले तर अर्जुनने लंचपर्यंत अर्धशतक पूर्ण केले. त्यानंतर अर्जुनने आक्रमक फलंदाजी करत १७८ चेंडूत आपले शतक पूर्ण केले. या दोघांनी सहाव्या विकेटसाठी नाबाद द्विशतकी भागीदारी करत गोव्याला १४० ओव्हर्समध्ये ४१० धावांपर्यंत पोहचवले.

▪ग्रामपंचायत निवडणुकीसाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज

# ६६७ मतदान केंद्रांची उभारणी, प्रत्येक मतदान केंद्रावर पाच कर्मचारी नियुक्त

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूर जिल्हातील १८९ ग्रामपंचायतींच्या निवडणूकीसाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली आहे. यासाठी ६६७ मतदान केंद्राची उभारणी करण्यात आली आहे. प्रत्येक मतदान केंद्रावर पाच याप्रमाणे पाच हजाराच्या असपास कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली जाणार आहे. १८ डिसेंबर रोजी सकाळी ७.३० ते साडेपाच वाजेपर्यंत मतदान तर २० डिसेंबर रोजी मतमोजणी होणार आहे.



१८९ ग्रामपंचायतींच्या निवडणूकीचा प्रचार अंतिम टप्प्यात आला आहे. १७ रोजी प्रचाराचा धुराळा संपणार आहे. प्रचारासाठी दोन दिवसच शिल्लक राहिले आहेत. त्यामुळे निवडणूकीचा प्रचार शिगेला पोहचला आहे. आरोप प्रत्योरोपांच्या फैरी झडत आहेत. जिल्हामध्ये निवडणूकीचा मोहोल आहे. भेटी गाठी, प्रचार फेरी यावर भर देत मतदारांची भेट घेतली जात आहे. प्रचारासाठी दोन दिवस शिल्लाक असल्याने उमेदवार तारेवरची कसरत करत आहे. १८९ ग्रामपंचातींच्या १७५२ जागासाठी तर १७४ सरपंचपदासाठी निवडणूका होत अअहे ३२९ सदस्य तर १५ सरपंच पदाच्या जागा बिनविरोध झाल्या आहेत. १४१८ सदस्य साठी तर १७४ सरपंच पदासाठी प्रत्यक्ष मतदान होणार आहे. यासाठी ६६७ मतदान केंद्र उभारणी केली जाणार आहे. मतदान केंद्रावर एक अधिकारी, एक मतदान यादी तपासणी आणि निरीक्षक एक शिपाई अशा पाच कर्मचाऱ्या प्रमाणे प्रत्येक पाच हजारच्या असपास कर्मचाऱ्यांची नियुकी केली आहे.

**तालुका निहाय मतदान केंद्राची संख्या**

करमाळा (८३), माढा (३२), बार्शी (५७), उत्तर सोलापूर (५७), मोहोळ (३०), पंढरपुर (३५) , माळशिरस (१५९), सांगोला (२१ ) मंगळवेढा (४९ ) दक्षिण सोलापूर (७१), अक्कलकोट (७३)

**सरपंचपद बिनविरोध झालेल्या ग्रामपंचायती**

करमाळा मधिल अंजनडोह, वंजारवाडी, लिंबेवाडी. माढामधिल शिंगेवाडी, उत्तर सोलापूर तालुक्यातील बेलगांव, देवगांव, गाडेगांव. मोहोळमधिल अर्धनारी, पंढरपुरातील सुगांव खुर्दे. माळशिरस मधिल नेवरे, सांगोल्यातील चिणके, पाचेगाव खुर्द. मंगळवेढा मधिल रहाटेवाडी, फटेवाडी आणि दक्षिण सोलापूरातील दर्गनहळ्ळी

**पुर्ण बिनविरोध झालेल्या ग्रामपंचायती**

एकूण १२ ग्रामपंचायती पुर्ण बिनविरोध झाल्या आहेत. सरपंचपद बिनविरोध झालेल्या ग्रामपंचायती पैकी सांगोला तालुक्यातील चिणके वगळता सर्व ग्रामपंचायती पुर्णत: बिनविरोध झाल्या आहेत.

# प्रांताधिकारी हेमंत निकम यांच्या भ्रष्ट कामाची चौकशी स्थगित

**तांत्रिक अडचणीचे कारण; खरे कारण गुलदसत्यात**

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूर उपविभागीय क्र.एकचे अधिकारी हेमंत निकम यांच्या कामाच्या चौकशीसाठी पुरवठा विभागाचे उपायुक्त डॉ.त्रिगुण कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली साताराच्या उपजिल्हाधिकारी संगिता राजापूरकर-चौगुलेसह जिल्हापुरवठा अधिकारी विवेक साळुंखे याची नियुक्ती केली होती. १४ ते१६ डिसेंबर तीन दिवस निकम यांच्या कार्यालयाची झाडाझडती घेतली जाणार होती. मात्र तपासणी समितीचा दौरा अचनाक स्थगित झाला आहे.



तांत्रिक कारण सांगितले जात असलेतरी वेगळीच चर्चा जिल्हाप्रशासनात चालू आहे. प्रात अधिकारी हेमंत निकम भ्रष्टाराचे अनेक प्रकरणे चव्हाट्यावर आले आहेत. याबाबत विभागय आयुक्त तसे केंद्रशासन, राज्यशासान आणि सीबीआय कडे तक्रारी दाखल आहेत. माजी मंत्री ॲड. दिलीप सोपल, सोलापूरचे सामाजीक कार्यकर्ते संदिप शितोळे, जयराज नागणसुरे यांनी तक्रारी करत निकम यांच्या भ्रष्ट कामाची चौकशी करण्याची मागणी केली होती. या तक्रारींची दखल घेऊन तीन जणांच्या समितीची नियुक्ती केली आणि पुरवठा विभागाचे उपायुक्त डॉ. त्रिगुण कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली ही सोलापूरात १४ डिसेंबर २०२२ रोजी सकाळी ९ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल होणार होते. सलग तीन दिवस प्रात अधिकारी निकम यांच्या कार्यालयाची तपासणी केली जाणार होती. तसे पत्र तपासणी अधिकारी आणि तक्रारदार तसेच उपविभागिय अधिकाऱ्यांना सूचना तपासणी पथाकच्या अध्यक्षांनी दिल्या होत्या. मात्र तपासणी समितीचा दौरा अचानक रद्द झाला आहे. तांत्रिक अडचणी मुळे ह चौकशी स्थगित करण्यात आली असल्याचे सांगण्यात आले आहे. वरिष्ठ पातळीवरून पुढील आदेश प्राप्त होताच चौकशी कामाची पुढील तारिख वेळ ठरणार आहे. मात्र अचानक चौकशी समितीचा दौराच रद्द झाल्याने उलट सुलट चर्चा जिल्हाप्रशासनात चालु आहे.




## तरुणीच्या पर्समधून रकेमसह दागिने पळविले

✔ **सोलापूर** : अनोळखी तीन महिलांनी एका तरुणीच्या पर्सची चैन उघडून रोख रक्कम व सोन्याचे दागिने असा एकूण १ लाख ६३ हजारांचा ऐवज चोरून नेल्याची घटना दि.११ डिसेंबर रोजी सकाळी सव्वा सात ते नऊ वाजण्याच्या दरम्यान शांती चौक ते मार्केट यार्ड दरम्यान घडली.याप्रकरणी अनुराधा गिरी नरोळे (वय-२६,रा.परमाळी झोपडपट्टी दाजी पेठ सोलापूर) हिने जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. अनुराधा ही ऑटो रिक्षामध्ये बसलेली असताना तीन अनोळखी महिला तिच्यासोबत होत्या व त्यानंतर अनुराधा ही मार्केट यार्ड सोलापूर ते नळदुर्ग जिल्हा उस्मानाबादच्या दरम्यान बसवकल्याण येथे जाणाऱ्या एसटी बसमध्ये बसली. त्यावेळी अनुराधा हिच्या पर्सची चैन उघडून सोन्याचे गंठण, कानातील झुमके, सोन्याची गळ्यातील गोप चैन, सोन्याची वेढणी व रोख रक्कम असा एकूण १ लाख ६३ हजारांचा ऐवज चोरून नेला आहे.तपास पोसई शेख हे करीत आहेत.

## बोलेरोची सायकलीला धडक; दोघे जखमी

✔ **सोलापूर** : बोलेरो पिकपने (क्रमांक एम.एच.१३. बीएल.०२८४) सायकलस्वार धडक देऊन जखमी केले. ही घटना १२ डिसेंबर रोजी सायंकाळी सहा वाजण्याच्या दरम्यान सोलापूर ते दहिटणे रस्त्यावर घडली. धरेप्पा रेवप्पा होनमोरे (वय-५४,रा.आयोध्या नगरी हैदराबाद रोड) व त्यांचा नातू रुद्र सागर होनमारे (वय-५) अशी जखमींची नावे आहेत. याप्रकरणी धरेप्पा होनमोरे यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा पुढील तपास पोह.दुधाळ हे करीत आहेत.

## पतीचा पत्नीवर चाकू हल्ला; पतीविरुद्ध गुन्हा

✔ **सोलापूर** : तू मला न विचारता इकडे कुठे चालली आहेस असे म्हणत पतीने शिवीगाळ करत पत्नीवर चाकूने वार करून जखमी केले.त्यानंतर पती पळून गेल्याची घटना दि.१३ डिसेंबर रोजी सकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास लोणावत यांच्या दुकानासमोर बेगम पेठ सोलापूर येथे घडली.याप्रकरणी गुलनाज शकील शेख (वय-३२,रा. राहुल गांधी झोपडपट्टी) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, त्यांच्या फिर्यादीवरून पती शकील शेख यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास सहायक फौजदार काझी हे करीत आहेत.

## चोरट्याने आठ लाखांचा ट्रक पळविला

✔ **सोलापूर** : आज्ञात चोरट्याने आठ लाख रुपये किमतीचा ट्रक क्रमांक एम.एच.१३.डीक्यू.१६८८ हा नडगिरी पेट्रोल पंपा समोर पार्क करून ठेवला असताना चोरून नेला आहे. ही घटना दि.१२ ते १३ डिसेंबर दरम्यान घडली.याप्रकरणी सतीश दत्तात्रय माने (वय-३६, रा.नम्रता हाऊसिंग सोसायटी विजापूर रोड) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा पुढील तपास पोसई मुरकुटे हे करीत आहेत.

# — कुर्डूवाडी पोलीस ठाण्याचे लवकरच स्थलांतर —

✔ सुराज्य/कुर्डूवाडी

कुर्डूवाडी पोलीस ठाण्यातची अत्याधुनिक नूतन इमारत बांधण्यात येणार असल्यामुळे लवकरच पोलीस स्टेशन माढा रोडवरील पंचायत समितीच्या बचत गटाच्या इमारतीमध्ये स्थलांतर होणार असल्याचे प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक विक्रांत बोधे यांनी सांगितले.

कुर्डूवाडी पोलीस ठाण्याची इमारत बांधण्यासाठी गेल्या दहा वर्षापासून प्रयत्न सुरू होते. मात्र कागदपत्राची पूर्तता होत नसल्यामुळे इमारत मंजुर झाली नाही. कुर्डूवाडी पोलीस ठाण्याचे प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक विक्रांत बोधे यांच्या सततच्या प्रयत्नाने व पाठपुराव्यामुळे ५ कोटी रुपये इमारत बांधकामाला मंजुरी मिळाली. कुर्डूवाडी पोलीस ठाण्याची १९८९ साली पोलीस स्टेशन सुरू झाल्याची नोंद दिसत आहे. यानंतर १९९१ साली बांधण्यात आलेल्या इमारतीचे उद्घाटन सोलापूरचे तत्कालिन पोलीस अधीक्षक प्रकाशराव पवार यांच्या हस्ते तर अतिरिक्त पोलीस अधीक्षक र.ज्ञा. नारववा यांच्या प्रमुख उपस्थिती होते. यानंतर १९९६ साली पोलीस निरीक्षक व सहाय्यक पोलीस निरीक्षकाच्या नूतन इमारतीचे उद्घाटन सोलापूरचे तत्कालिन पोलीस अधीक्षक अशोक शर्मा यांच्या हस्ते व उपविभागीय पोलीस अधीक्षक प्रभाकर बुधवंत उपस्थिती होते.

कुर्डूवाडी पोलीस स्टेशनच्या नव्याने बांधण्यात येणाऱ्या पाच कोटीच्या नुतन इमारतीमध्ये खालील बाजूस पार्किंग व ठाणे अंमलदार कार्यालय, वरच्या मजल्यावर पोलीस निरीक्षक व सहाय्यक पोलीस निरीक्षक कार्यालय, मीटिंग हॉल, पोलीस कर्मचाऱ्यांसाठी लॉकर व रेकॉर्ड रूम, जेल, स्वच्छतागृह आशा अत्यधिक इमारत एक वर्षात पूर्ण होणार असल्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विक्रांत बोधे यांनी सांगितले.

**कुर्डूवाडी पोलीस स्टेशन आउट पोस्ट होते**

तालुक्याच्या ठिकाणी एक पोलिस स्टेशन होते. माढा तालुक्यातील कुर्डूवाडी रेल्वे जंक्शन असल्यामुळे कुर्डूवाडी आउट पोस्ट पोलीस स्टेशन सुरू झाले. त्यानंतर रेल्वे गाड्यांची संख्या वाढत गेली व लोकसंख्या वाढल्याने कुर्डूवाडी स्वतंत्र पोलीस स्टेशन करण्यात आले.१९९८ साली एक पोलिस निरीक्षक व ३४ पोलीस कर्मचाऱ्यांची नेमणूक होते. ती आज एक पोलीस निरीक्षक, दोन सहाय्यक पोलीस निरीक्षक ५८ पोलीस कर्मचारीची पद संख्या आहे.






## एटीएम कार्डची अदलाबदल करून ९० हजाराला फसवले


✔ सुराज्य/सोलापूर

एटीएम कार्डची अदलाबदल करून एकास नव्वद हजार रुपये रक्कम एटीएम मधून काढून घेऊन फसवणूक केल्याची घटना दि.१२ डिसेंबर रोजी रात्री अशोक चौक सोलापूर येथे घडली. याप्रकरणी नवनाथ सुग्रीव चीट्टमपल्ली (वय-४२, रा.कोटा नगर, जुना विडी घरकुल) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात अनोळखी मुलाविरुद्ध फिर्याद दिली आहे. नवनाथ हे वरील ठिकाणी एटीएम मशीन मधून पैसे काढत होते. त्यावेळी त्यांच्या पाठीमागे उभा असलेल्या अनोळखी मुलाने नवनाथ यांना मिनी स्टेटमेंट काढण्यास सांगितले. ते स्टेटमेंट काढत असताना अनोळखी मुलाने त्यांच्या कार्डचा पासवर्ड पाहिला. स्टेटमेंट काढल्यानंतर हातचालाकीने एटीएम कार्डची अदलाबदली केली. मशीनमध्ये पैसे नसल्याचे सांगत ९० रुपये काढून घेतले. पो.स.ई. बादोले तपास करत आहे.

## १६ डिसेंबरचा बंद दुपारी दोन वाजेपर्यंतच

✔ सुराज्य/सोलापूर

राज्यपाल भगतसिंग कोश्यारी व राज्याचे मंत्री चंद्रकांत पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, सावित्रीमाई फुले, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याबद्दल अमानकारक वक्तव्या केल्याबद्दल त्यांच्या निषेधार्थ श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्यावतीने शुक्रवार १६ डिसेंबर रोजी सोलापूर शहर बंद करण्यात येणार असून हा बंद दुपारी दोन वाजेपर्यंत राहणार असल्याची माहिती नेते पुरुषोत्तम बरडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.



शुक्रवार दि. १६ डिसेंबर रोजी सकाळी नऊ वाजता छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन रॅली सुरुवात होणार आहे. तसेच महात्मा ज्योतिबा फुले, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुतळ्यांना अभिवादन करण्यात येणार आहे. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून रॅलीचा समारोप होणार आहे. तरी बंदच्या वेळेची सर्व व्यापारी वर्गाने नोंद घेऊन १०० टक्के बंद यशस्वी करावा असे आवाहन शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. या पत्रकार परिषदेत पद्माकर काळे, राजन जाधव, चेतन नरोटे, गणेश डोंगरे, भारत जाधव, श्रीकांत डांगे, उत्सव अध्यक्ष शेखर फंड आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## करजगी यांच्या घरी पावणे दोन लाखांची चोरी

✔ **सोलापूर** : सोनाशंकर निवास बाळे येथे राहणारे कुमार शंकर करजगी (वय-७४, रा.सोना शंकर निवास बाळे, तालुका उत्तर सोलापूर) यांच्या घरातून १ लाख ८० हजार रुपये किमतीचा ऐवज चोरून नेल्याची घटना दि.२९ नोव्हेंबर रोजी रात्री नऊ ते दहा वाजण्याच्या दरम्यान घडली. याप्रकरणी कुमार करजगी यांनी फौजदार चावडी पोलीस ठाणे फिर्याद दाखल केली आहे.

रवींकुमार उर्फ रमेशकुमार अंब्लेसप्पा कुरबा (रा.एमपीसीएल कॉलनी, रायचूर, कर्नाटक) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला. करजगी यांच्या घरी माळी काम करणारा वरील संशयित आरोपी रवींकुमार याने करजगी यांच्या घरातील चार तोळे सोन्याच्या तीन अंगठ्या व पाच तोळे वजनाच्या लिंगाकार असा एकूण १ लाख ८० हजारांचा ऐवज चोरल्याचे फिर्यादीत नमूद आहे. तपास साहेब पोलीस निरीक्षक धायगुडे हे करीत आहेत.

## महिलांच्या नेतृत्व विकासावर उद्यापासून विद्यापीठात प्रशिक्षण कार्यक्रम

✔ **सोलापूर** : विद्यापीठातील वुमेन सेल आणि महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था, पुणे (एमएसएफडीए) यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांच्या नेतृत्व विकासावर पाच दिवसीय विशेष प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून याचे उद्घाटन शुक्रवार, दि. १६ डिसेंबर २०२२ रोजी हा वाजता होणार असल्याची माहिती कुलगुरू डॉ.फडणवीस यांनी दिली.

ही कार्यशाळा दि. १६ ते २० डिसेंबर २०२२ यादरम्यान विद्यापीठाच्या सामाजिकशास्त्रे संकुलातील सभागृहात होणार आहे. शैक्षणिक संस्थेच्या सर्वांगीण विकासासाठी, नवीन व्यवस्थापकीय आव्हाने प्रभावीपणे हाताळण्यासाठी, महिलांचे नेतृत्व विकसित करून त्यांना कौशल्याने सक्षम करण्यासाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यशाळेचे उद्घाटन सोलापूर महानगरपालिकेच्या आयुक्त शितल तेली-उगले यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस या असतील. यावेळी एमएसएफडीएचे समन्वयक निखिलेश भाकरे, विद्यापीठाच्या कुलसचिव योगिनी घारे यांची प्रमुख उपस्थिती असेल. सोलापूर विद्यापीठ आणि एमएसएफडीए यांच्यावतीने पहिल्यांदाच हा राज्यस्तरीय महिला नेतृत्व क्षमता निर्माण प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे. यामध्ये लातूर, उस्मानाबाद, गडचिरोली, नागपूर, मुंबई, अमरावती, सांगली, सातारा, पुणे येथील वरिष्ठ महिला अधिकाऱ्यांचा सहभाग आहे.

## अक्कलकोटसाठी केंद्रीय रस्ते विकासनिधीतून १० कोटी; आ.कल्याणशेट्टी यांची माहिती

✔ सुराज्य/सोलापूर

अक्कलकोट तालुक्यातील दोन रस्त्यांसाठी केंद्रीय रस्ते विकास व पायाभूत सोयीसुविधा निधीतून १० कोटी रुपये मंजूर झाले आहेत, अशी माहिती आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी दिली आहे.



या मंजूर कामात दोड्याळ ते जेऊर या रस्त्याचे रुंदीकरणांसह सुधारणा करणे यासाठी ५ कोटी, शावळ फाटा ते कुडल ते देवीकवठे ते म्हैसलगी यातील प्रमुख जिल्हा मार्ग असलेला ६ कि.मी. मार्ग हा सुधारणा करणे या कामासाठी ५ कोटी निधी मंजूर आहे. दोन्ही रस्त्यासाठी एकूण १० कोटी रुपये मंजूर झाले आहेत. यापूर्वी राज्य शासनाच्या अर्थसंकल्पात अक्कलकोट ते दोड्याळ रस्त्यासाठी सध्या असलेल्या ३ मिटरचा रस्ता रुंदीकरणातून सुधारणा करून तो ५.५० मिटरचा केला जाणार आहे. आता यावेळच्या निधीतून दोड्याळ ते जेऊर सुद्धा ५.५० मिटरचा होणार आहे. येत्या काळात अक्कलकोट ते जेऊर हा पूर्ण रस्ता ५.५० मिटरचा होणार आहे. केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांनी यापूर्वी तिलाटी गेट वळसंग धोत्री मार्गे मुस्ती ते तांदुळवाडी, अक्कलकोट ते नागणसुर मार्गे बोरोटी सीमा, वागदरी ते भुरीकवठे तसेच धोत्री ते हन्नूर, चुगी, किणी ते काजिकणबस रस्ता यासाठी कोट्यावधीचा निधी दिलेला आहे. निधी मंजूर केल्याबद्दल आ. कल्याणशेट्टी यांनी गडकरी यांचे आभार मानले आहेत.

**प्रत्येक गावाचा समतोल विकास करणार**

सीमा भागासह माझ्या विधानसभा क्षेत्रातील प्रत्येक गावाचा समतोल विकास व्हावा यासाठी माझे वैयक्तिक लक्ष असून यासाठी निधीची कोणतीही कमतरता पडू देणार नाही. केंद्र व राज्य शासन मार्फत उर्वरित रस्ते सुद्धा नवीन होण्यासाठी लागणाऱ्या निधीसाठी पाठपुरावा सुरूच राहणार आहे, असे आ.सचिन कल्याणशेट्टी यांनी म्हटले आहे.

# महापालिकेच्या वसुली मोहिमेने गाळेधारकांचे धाबे दणाणले

## हजारो गाळेधारकांकडे कोट्यवधींची थकबाकी

✔ सुराज्य/सोलापूर

महापालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी शहरातील मोठ्या कर थकबाकीदारांवर कारवाईसाठी महापालिका आयुक्तांनी चांगलाच जोर धरला आहे. सात दिवसात तब्बल सव्वा सात कोटींची वसुली पालिकेच्या पथकाने केली आहे. आता १५ डिसेंबरनंतर सर्वच थकबाकीदारांवर कारवाईचे आदेश प्रशासनाने दिला आहे.

यामध्ये आता हजारोंच्या संख्येने असणारे गाळेधारक प्रामुख्याने आघाडीवर असणार आहेत. त्यामुळे आता राजकीय पाठबळासह महापालिकेतील अधिकाऱ्यांच्या वरदहस्ताने थाटलेल्या व्यवसायांचे पितळ उघडे पडणार आहे. शहरात महापालिकेच्या विविध शॉपिंग सेंटरमध्ये मिनी व मेजर असे साधारण १ हजार ३८० गाळे आहेत. शहराच्या मुख्य बाजारपेठेत हे गाळे उभारलेले आहेत. या गाळ्यांच्या माध्यमातून महापालिकेला वार्षिक पाच कोटी रुपयांचा महसूल अपेक्षित आहे. याच बाजारपेठेतील खासगी गाळ्यांचा दर महापालिकेच्या दहापट अधिक आहे.

मात्र, वर्षानुवर्षे व्यवसाय मांडून बसलेल्या व्यापाऱ्यांचा मात्र भाडेवाढीला नेहमीच विरोध राहिला आहे. पालिकेने भाडेवाढ केली की आंदोलने आणि न्यायालयाच्या माध्यमातून हे गाळेधाकर आपला बचाव करताना आतापर्यंत दिसून आले आहेत. मात्र आता नूतन आयुक्त शितल तेली उगले यांनी शहरातील गाळ्यांची माहिती घेण्यात घेऊन नियोजनबद्ध आराखडा तयार करून कारवाईची दिशा ठरविण्यात येईल, असे सांगितले आहे. त्यामुळे गाळेधारकांचे धाबे दणाणले आहेत. तत्कालीन आयुक्त पी. शिवशंकर यांनी गाळेधारकांच्या वसुलीसाठी बेधडक मोहीम राबवत थकबाकीदारांकडून वसुली केली तर काही नव्या ठिकाणच्या जागांचे ऑनलाइन व ऑफलाइन लिलाव घेऊन महापालिकेचा महसूल वाढवण्याचर भर दिल्याचे दिसून आले. आता नूतन आयुक्त तेली उगले यांच्या आदेशानुसार मागील काही दिवसांपासून शहरातील शिक्षण संस्थांवर धडकेबाज कारवाई सुरू आहे.

थकबाकीदार अनेक शिक्षणसंस्था सिल केल्या आहेत. या संस्थांनंतर आता गाळेधाकर रडारवर आहेत. त्यामुळे अनेकांचे धाबे दणाणले आहेत.



**शहरातील ३६ गाळ्यांचा आज लिलाव**

महापालिकेच्या मालकीच्या असलेल्या ११ शॉपिंग सेंटरमधील ३६ गाळ्यांचा लिलाव १५ डिसेंबर रोजी होणार आहे. या लिलावासाठी इच्छुक असलेल्या व्यावसायिकांनी ५०० रुपये भरून कागदपत्रांसह समक्ष उपस्थित राहावे, असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

**माहिती घेऊन कारवाईची दिशा ठरवू : आयुक्त**



प्रत्येक विभागाचा आढावा घेण्याचे काम सुरू आहे. महापालिकेचा कर थकबाकीचा आकडा अधिक होता. त्यामुळे शहरातील मोठ्या थकबाकीदारांकडून वसुली, हे आमचे लक्ष्य आहे. या मोहिमेनंतर शहरातील गाळ्यांची माहिती घेण्यात येईल. त्यासाठी नियोजनबद्ध आराखडा तयार करून कारवाईची दिशा ठरविण्यात येईल, असे आयुक्त शीतल तेली-उगले यांनी सांगितले.

## सांगोला-मंगळवेढा-सोलापूर रेल्वे मार्गास मंजुरी द्या : खा.महास्वामी

✔ **सोलापूर** : सांगोला येथील प्रसिद्ध डाळिंब, मंगळवेढ्याची प्रसिद्ध ज्वारी तसेच सोलापूर अध्यात्मिक नगरीस जोडणारा सांगोला - मंगळवेढा - सोलापूर नवीन रेल्वे मार्ग झाल्यास जिल्ह्याच्या विकासाला अधिक गती मिळेल. त्यामुळे या नवीन रेल्वे मार्गाचे सर्व्हेक्षण करून मंजुरी देण्याबाबत संयुक्त बैठक बोलाविण्यात यावी अशी मागणी करीत खा. डॉ. जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामीजींनी संसदेच्या हिवाळी अधिवेशनात हा प्रश्न मांडला. ते म्हणाले की, सोलापूर जिल्ह्यातील सांगोला ते सोलापूर हे अंतर सुमारे ८५ किलोमीटर आहे. सोलापूर ते सांगोला हा फक्त रस्ता उपलब्ध आहे. सांगोला सह सोलापूर जिल्ह्यात चांगल्या प्रतीचे डाळिंबाचे पीक मोठ्या प्रमाणात घेतले जाते. सांगोल्यातील डाळिंब परदेशातही निर्यात केले जातात. यासोबतच मंगळवेढ्याची ज्वारी प्रसिद्ध आहे.



मंगळवेढा ज्वारीला देशभरात मागणी आहे. शेतकऱ्यांना शहराच्या बाजारपेठेशी जोडण्यासाठी आणि वाढत्या शहरीकरणाच्या दृष्टीने रेल्वे हे अत्यंत किफायतशीर वाहतुकीचे साधन आहे. त्यामुळे सांगोला-मंगळवेढा - सोलापूर रेल्वे मार्ग सुरू झाल्यास सांगोला व मंगळवेढा येथील शेतकऱ्यांना आपला माल सोलापूरलाच नव्हे तर देशातील इतर शहरातही पाठविण्याची सुविधा मिळू शकेल. या रेल्वे मार्गाच्या सर्वेक्षणाबाबत मंगळवेढा सांगोला व सोलापूरचे लोकप्रतिनिधी व रेल्वे मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक बोलावून सांगोला-मंगळवेढा-सोलापूर रेल्वे मार्गाला मंजुरी द्यावी, अशी मागणी करीत या रेल्वे मार्गास लवकरात लवकर मंजुरी देण्याची मागणी खा. डॉ. जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामीजींनी केली.